अमृतवेल

# गव्हर्नन्स

September 2020 / ₹ : 100/-

www.amrutwelmedia.com




# चाळीसगावची जलक्रांती

डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण
IRS

AMRUTWEL MEDIA
अमृतवेल मीडिया

# EXCHANGE OF IDEAS



## LET'S JOIN HANDS

9890080121 / 9225828602
www.amrutwelmedia.com

# शुभ संदेश



जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्याच्या परिसरातील १६ गावांमध्ये डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखालील जलसंधारण अभियानास सकाळ रिलीफ फंडकडून सहकार्य करण्यात आले आहे. या गावांमध्ये जलसंधारणाची विविध कामे झाली. लोकांनीही मोठा सहभाग दिला. या कामांमुळे गावातील व परिसरातील पाण्याची पातळी वाढली आहे. शेतशिवारात पाणी वाहत आहे, त्यामुळे या परिसरातील सर्व सामान्यांपासून शेतकरीवर्ग समाधान व्यक्त करत आहे. सकाळ रिलीफ फंड व लोकसहभागातून महाराष्ट्रातील एकूण ७५० गावांमध्ये जलसंधारणाची कामे केली आहेत. या माध्यमातून जलसंपन्न महाराष्ट्राचे स्वप्न आकारास येत आहे.

**प्रतापराव पवार** अध्यक्ष, सकाळ माध्यम समूह

शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास अशा विविध रचनात्मक सामाजिक कामामध्ये भारतीय जैन संघटना कार्यरत आहे. गेल्या काही वर्षांत जलसंधारणाच्या कामास बीजेएसने प्राधान्य दिले आहे. महाराष्ट्रात ठिकठिकाणी होत असलेल्या जलसंधारणाच्या कामांसाठी बीजेएसने पोकलॅंड, जेसीबी मशीन उपलब्ध करून दिली आहेत. चाळीसगाव येथील कामाचा अनुभव अतिशय चांगला आहे. मशीनच्या डिझेलच्या खर्चाची जबाबदारी लोकांनी उत्स्फूर्तपणे उचलली, त्यामुळे या कामाला खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. या कामांमुळे पाणीसाठा झाला याचा तर आनंद आहेच; पण त्याहीपेक्षा लोकांमध्ये जागृती होत असल्याचा आनंद अधिक आहे.



**शांतीलाल मुथा** अध्यक्ष, भारतीय जैन संघटना



**उदय शंकर झा**
संचालक,
रोटरी क्लब ऑफ चेंबूर



**सुरेश भोसले**
संचालक,
रोटरी क्लब ऑफ चेंबूर



**अभय जोशी**
संचालक,
रोटरी क्लब ऑफ चेंबूर



**सुहास कुलकर्णी**
संचालक,
रोटरी क्लब ऑफ चेंबूर

रोटरी क्लब ऑफ चेंबूर, मुंबईला 'मिशन ५०० कोटी लिटर्स पाणीसाठा' प्रकल्पामध्ये सहभागी होण्यास आनंद आणि दिलासादायी वाटते. रोटरी क्लब ऑफ चेंबूर जागतिक रोटरी संघटनेचा भाग आहे. जगभरात २२० देशांत १२ लाख रोटरीयन अव्याहतपणे समाजसेवेचे काम करीत आहेत. आरोग्य, सेवा, शिक्षण, अल्प उत्पन्न गटाचे आर्थिक स्तर उंचाविण्यास मदत आणि जलसंधारण क्षेत्रात काम करीत आहे. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण आणि त्यांचे सहकारी मेहनतपूर्वक काम करीत आहेत. यातून शेती व पिण्यासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. त्यांच्या प्रकल्पास रोटरी क्लब ऑफ चेंबूरच्या हार्दिक शुभेच्छा!



# चाळीसगावची फत्तेशिकस्त !

'जल है तो कल है' असे म्हणतात. या उक्तीचे महत्त्व वेगाने लक्षात येत आहे. ज्यांनी याचे महत्त्व ओळखले त्यांनी भगीरथाचा आदर्श घेतला. अखंड मेहनत घेतली. आव्हानांचे पहाड फोडले. टीकेचे घाव सोसले. उपेक्षेचा सामना केला आणि खऱ्या अर्थाने ते 'जलयोद्धे' ठरले.

या जलयोद्ध्यांना प्रेरणा देणाऱ्या 'पानि फाउंडेशन'सारख्या अनेक संस्था तयार झाल्या. भारतीय जैन संघटना, रोटरी क्लब, सकाळ रिलिफ फंड आदी नानाविध सामाजिक संस्थांनी भक्कम पाठबळ दिले. गावाबाहेर विविध क्षेत्रांतील कार्यरत भूमिपूत्रांनी मदतीचा हात दिला. सोबतीला 'जलयुक्त शिवार', 'शिवजलक्रांती'सारख्या शासकीय योजनाही होत्या. त्याहून महत्त्वाचे म्हणजे ध्येयाने पछाडलेल्या व्यक्तीदेखील होत्या. या सगळ्यांचा समसमा संयोग जुळून आला आणि गेल्या काही वर्षापासून कोरड्या पडलेल्या विहिरी, नद्या मे महिन्याच्या कडक उन्हाळ्यातही वाहू लागल्या आणि शिवारात पाणी खेळू लागलं.

जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव परिसराची ही गोष्ट. भारतीय राजस्व सेवेत (आयआरएस) असलेले डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी येथील तरुणांना दिशा दिली. ध्येयवेड्या जलयोद्ध्यांचे संघटन केले. जून २०१९ मध्ये चाळीसगाव येथे 'पाण्याचे चर्चासत्र' आयोजित केले होते. त्या मंथनातून ११ जलयोद्धे या अभियानासाठी सज्ज झाले. प्रत्येकी ५ गावांची जबाबदारी देण्यात आली. त्यांना मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्यात आले. दिशादर्शन केले आणि पाण्याने भरलेल्या जलस्रोतांचे स्वप्न दाखविले. विविध क्षेत्रांतील 'मोती' पाणी या एका धाग्यात गुंफले. या अभियानाद्वारे '५०० कोटी लिटर्स जलसाठा' निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. या चळवळीचे शिलेदार शिक्षक होते, पत्रकार होते, नोकरदार होते, उत्साही महिला होत्या, विद्यार्थी होते, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी होते. नेते होते, गावातील कार्यकर्ते होते. चळवळींना साथ देणाऱ्या संस्थाही होत्या. तरीही हा प्रवास सोपा नव्हताच. मोहीम फत्ते करायचा दृढनिश्चय मात्र होता. नियोजन झाले, कामाचे आराखडे बनले. जलयोद्ध्यांनी सर्वतोपरी तयारी केली आणि दरम्यान लॉकडाऊन झाले; पण तशाही परिस्थितीत निर्माण झालेल्या संकटांना, अडचणींना सामोरे जात आणि लॉकडाऊनचे निकष पाळून कामाला सुरुवात केली. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शन आणि प्रेरणेतून निर्माण झालेली ऊर्जा घेऊन हे 'पाच-पाटील' जोमाने कार्यरत झाले. या



संपादक *
**धर्मेंद्र पवार**

गोवा प्रमुख
**प्रभाकर ढगे**

फिचर एडीटर
**विलास पाटील**

समन्वयक
**उल्हास फडतरे**

कंटेण्ट प्लॅनिंग, डिझाईन
**अमृतवेल मीडिया**



'जलयोद्ध्यांनी' अहोरात्र मेहनत घेतली. लोकांना प्रोत्साहित केले. संघटन अधिक व्यापक बनलं. साधारण ६२ गावांमध्ये जलसंधारणाच्या कामासंदर्भात 'जलजागृती आणि जनजागृती' करण्यात आली.

'गाव करील, ते राव करील काय' या न्यायाने एक मोठी चळवळ उभी राहिली. पाणी आले तशी समृद्धी आली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकोप्याची भावना वाढीस लागली. एकत्र आलो तर आपण कोणतेही आव्हान सहज पेलू शकतो, अशी सकारात्मक भावना निर्माण झाली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकरी जागृत झाला. आपलं पाणी आपणही निर्माण करू शकतो, हा आत्मविश्वास बलदंड बनला. पहिल्या दोन वर्षातील कामांमुळे झालेला शिवारातील बदल पाहिला होताच, त्यामुळे शेतकरी बांधवही तन, मन, धन अर्पूण या चळवळीच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले.

हे कुणा ऐकाचे काम राहिले नाही. लोकांची, लोकांसाठी, लोकसहभागातून सुरू असलेली चळवळ बनली. कोणत्याही पदाशिवाय आणि आधाराशिवाय चालणारी चळवळ, अशी रचना तयार झाली. निरपेक्ष भावनेतून सुरू झालेल्या या कामाला लोकाश्रय मिळाला. लोकांनी सर्वतोपरी मदत केली. सामाजिक संस्था, राजकीय नेतेही मदतीसाठी सरसावले आणि बघता- बघता उद्दिष्ट साध्य झाले. नाले खोलीकरण, नदीचे पुनरुज्जीवन, फुटलेल्या बांधाची दुरुस्ती, धरणातील गाळ काढणे असे व्यापक जलसंधारणाचे काम झाले. इतकेच नव्हे तर काही ठिकाणी शेत रस्ते बनविण्यात आले. लोकांची सामूहिक ताकद काय करू शकते? याचे प्रतिबिंब दिसू लागले. या पावसाळ्यात आता शिवार पाणीदार बनले. पाणीपातळी आणि पाणीसाठा वाढला. नदी झुडपांनी भरली होती, ती पाण्याने भरली. विहिरींचे पाणी वाढले. शेतकरी बांधवांमध्ये आनंदाचे, समाधानाचे सूर उमटले.

हे आहे, चाळीसगावच्या मिशन '५०० कोटी लिटर्स जलसाठा' या चळवळेचे फलित. ही आहे सहभागी झालेल्या 'जलयोद्ध्यांच्या'च्या संघर्षाची कथा. ती रंजक आहेच; पण प्रेरक आहे. पराक्रमाची आणि ध्येयवेडाची 'उज्ज्वल' परंपरा सांगणाऱ्या महाराष्ट्राच्या इतिहासातील एक लखलखीत पानदेखील आहे... ग

Volume 5 ▪ Issue 11 ▪ SEP 2020

हे मासिक अमृतवेल मीडिया प्रा.लि. साठी मुद्रक, प्रकाशक सारिका पवार यांनी श्रीपाद वल्लभ मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून **ऑफिस नं. १, सिद्धिविनायक प्लाझा, तवनाप्पा पाटणे हायस्कूलसमोर, राजारामपुरी, ११ वी गल्ली, कोल्हापूर** येथून प्रसिद्ध केले.

मालक
**अमृतवेल मीडिया प्रा. लि.**
**मुंबई ऑफिस** : ८४ ए, बरोच सदन, ५०३/ पाचवा मजला, देवजी रतनसे मार्ग, दाना बंदर, मुंबई-४००००९.

अंक सुरू करण्यासाठी
व अधिक माहितीसाठी

**9890080121 / 9225828602**

amrutwelmedia@gmail.com
www.amrutwelmedia.com
www.facebook.com/Amrutwel-Governance

© 'अमृतवेल गव्हर्नन्स'च्या अंकामध्ये प्रसिद्ध झालेला मजकूर आणि फोटोचे कोणत्याही स्वरूपात पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे.
– संपादक

*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.


विणुया धागे आनंदाचे..!
पैठणी म्हणजेच
कापसे पैठणी®
काळा मारुती रोड, येवला. जि. नाशिक.
फोनः (02559) 267358,मो.9028163777


With Best Compliments from
गोदा फार्मस्
शेतकऱ्यांची औद्योगीक चळवळ
सामाजिक बांधिलकी जपणारी कंपनी
500 Cr
Water Storage
Moments
Godavari Valley Farmers
Producer Company Limited
At Sai Naagar , Near Bharat Petrolium , Main Road , Kalamnuri Dist Hingoli

# CONTENT



जलक्रांतीची गोष्ट — 06
डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण


जल अभियानातून समाज परिवर्तन! — 13
तुषार निकम


केल्याने होत आहे.. — 18
शेखर निंबाळकर


मनसंधारणातून जलसंधारण..! — 22
सविता राजपूत


पत्रकार ते जलयोद्धा — 26
पंकज पवार


...ब्राम्हण शेवगे पाणीदार! — 30
सोमनाथ माळी


नवी दृष्टी, नवा संकल्प — 33
हेमंत मालपुरे


जामद्याची जलगुढी — 36
एकनाथ माळतकर


वृक्षारोपण आणि जलसंधारण — 40
प्रा. आर. एम. पाटील


चळवळीला पाठबळ! — 43
शशांक अहिरे


पाणीदार तळेगाव! — 46
सचिन राणे

# जलक्रांतीची गोष्ट!

प्रशासकीय अधिकारी सेवेत राहून देशासाठी आणि समाजासाठी योगदान तर देतातच शिवाय समाजात असलेली आपली प्रतिमा, आपले गावकरी, परिसरातील लोक यांना सोबत घेऊन एखादी मोठी लोकोपयोगी चळवळ उभी करता येते. तो धडा घालून दिला आहे डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी. ते भारतीय राजस्व सेवेत (IRS) मुंबईत कार्यरत आहेत. मूळचे ते जळगाव जिल्ह्यातील चाळीसगावचे. शिक्षण घेत असताना, पाण्याअभावी होणारी गावाची, तालुक्याची आणि जिल्ह्याची परवड ते  पाहात होते. पाण्याअभावी शेती गेली, रोजगारासाठी स्थलांतर झाले, हसती- खेळती गावे ओस पडू लागले. पिण्याच्या पाण्याचे टँकर फिरू लागले, हे त्यांनी स्वत: पाहिले, अनुभवले. ही परिस्थिती सुधारण्यासाठी काहीतरी केले पाहिजे. पाण्यासाठी चळवळ उभारली पाहिजे आणि लोकांना सोबत घेऊन पाण्याचा प्रश्न सोडविला पाहिजे, हे त्यांनी मनाशी निश्चित केले होते. त्यातूनच ‘मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा’ या संकल्पनेचा जन्म झाला. यातून लोकचळवळ निर्माण झाली. हजारो हात राबले. शेतशिवार फुलले. त्या चळवळीच्या ‘अथपासून इति’पर्यंतची ही गोष्ट...





जलपूजन करताना...



पाणी चळवळीत डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांचे हे तिसरे वर्ष होते. पहिल्या वर्षी त्यांनी आपल्या आजोळी म्हणजेच चाळीसगाव तालुक्यातील धामणगाव येथे '१४ कोटी लिटर्सचा जलसाठा' केला होता. दुसऱ्या वर्षी म्हणजे २०१८–१९ या वर्षांत सहा गावांत जलसंधारणाचे काम पूर्ण केले होते. यात धामणगाव, रांजणगाव, शिदवाडी, कळमूड, वरखेडे आणि कुंझर या गावांचा समावेश होता. तिसऱ्या वर्षी ही चळवळ तालुकाभर नेली. ६२ गावांत जनजागृती करण्यात आली. तालुक्यात '५०० कोटी लिटर्स जलसाठा' करायचा, असे मिशन हाती घेण्यात आले. १६ गावांत भर उन्हाळ्यात काम झाले. एकूण '१०२ कोटी लिटर्स जलसाठा' निर्माण करण्यात आला.

२०१८–१९ साली चाळीसगाव तालुक्यात पानि फाउंडेशनची कामे झाली होती. डॉ. चव्हाण यांच्या माध्यमातून सहा गावांमध्ये जलसंधारणाची कामे करण्यात आली. या सगळ्या कामांचा अनुभव मांडण्यासाठी जून २०१९ मध्ये चाळीसगाव येथे 'पाण्याचे चर्चासत्र' आयोजित करण्यात आले होते. त्यात १५ गावांतील ४० ते ५० जलयोद्धे सहभागी झाले होते. यावेळी अनुभव कथनातून असे लक्षात आले की, गावागावात पाण्याचे काम करण्यासाठी लोक इच्छुक आहेत; पण या लोकांचे संघटन करणे, कामाचे नियोजन करणे, मशीन देऊ शकणाऱ्या दात्यांशी संपर्क साधने आदी कामांची जबाबदारी घेऊ शकतील, असे नेतृत्वक्षम लोकांची आवश्यकता आहे. एका दिशेने चालणारे, एका ध्येयाने पछाडलेले लोक तयार करणे गरजेचे आहे.

'व्यक्तिमत्त्व विकसन आणि नेतृत्त्वगुण विकसन' यासाठी 'लँडमार्क फोरम'चा आंतरराष्ट्रीय ख्यातीचा उपक्रम डॉ. चव्हाण यांनी केला होता. अगदी तसाच उपक्रम पाण्यासाठी राबवायचे ठरविले. यात सहभागी होणाऱ्या लोकांमध्ये 'काम करण्याची इच्छा' आणि 'वेळ देण्याची तयारी' हे दोनच निकष लावण्यात आले. या उपक्रमासाठी कोणताही मोबदला मिळणार नव्हता. घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजणे, असे हे सुरुवातीला वाटले असेल. यासाठी ११ लोक तयार झाले. तुषार निकम, शेखर निंबाळकर, सविता राजपूत, पंकज पवार, एकनाथ माळतकर, आरस्ता माळतकर, हेमंत मालपुरे, शशांक अहिरे, आर. एम. पाटील, सचिन राणे, सोमनाथ माळी हे ते जलयोद्धे होते. दर पंधरा दिवसांनी शनिवारी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत या सर्वांची कार्यशाळा चालायची आणि रविवारी त्यावर काम करायचे असायचे. या जलयोद्ध्यांना प्रत्येकी ५ गावांची जबाबदारी देण्यात आली होती. पूर्वी एका गावाची जबाबदारी असलेल्या व्यक्तीला



# लोकांनी, लोकांसाठी चालवलेली चळवळ

*एकत्र येऊन आपण काम करू शकतो आणि सगळ्यांचाच फायदा करून घेऊ शकतो, याचा अनुभव सामान्य शेतकरी आपल्या शब्दांत मांडत आहे. एक नवीन व्यासपीठ जे याआधी शेतकऱ्यांना उपलब्ध नव्हते, ते अशा अनेक शेतकऱ्यांना उपलब्ध झाले आहे. लोकांनी लोकांसाठी चालवलेली चळवळ, असे स्वरूप या 'पाणी चळवळी'ला प्राप्त झाले आहे. एकत्र येऊन आपण आपला पाणीप्रश्न सोडवू शकतो तर स्वच्छता, आरोग्य, शिक्षण असे अनेक प्रश्नही सोडवू शकतो. ही भावना निर्माण होणे आणि तसा आत्मविश्वास तयार होणे, हेच या चळवळीचे महत्त्वाचे फलित असेल.*

'पाटील' अशी पदवी होती. म्हणून ५ गावांची जबाबदारी असलेल्या व्यक्तीला डॉ. चव्हाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'पाच-पाटील' असे नाव दिले.

### चळवळीचे बीजारोपण

सप्टेंबर २०१९ ते मे २०२० हा कामाचा कालावधी ठरविण्यात आला. यात पहिले तीन महिने म्हणजे सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबर स्वतःवरच काम करायचे होते. यामध्ये प्रत्येकाने स्वतःची दिनचर्या लिहिणे, त्यातून फावला वेळ कमी करणे, स्वतःची अपूर्ण कामे शोधणे, लिहून काढणे आणि ती महिनाभरात पूर्ण करणे, स्वतःच्या उणिवा आणि शक्तिस्थाने शोधणे, त्यासाठी आपल्या निकटवर्तीयांच्या मुलाखती घेणे, नातेसंबंधातील तणाव दूर करणे आणि त्याबद्दल स्वतः पूर्ण आणि स्थिर होणे, असे या प्रशिक्षणाचे स्वरूप होते. नेतृत्वासाठी तयार होण्यासाठी स्वतःच्या भावनांशी ओळख करायची होती. त्यात भीती कशाची वाटते, अपयशानंतर काय भावना निर्माण होते, यशाची गुरुकिल्ली काय, द्वेष-राग कशाचा येतो, हे बघायचे होते. आपला शब्द म्हणजे आपले अस्तित्व असते, याची प्रकर्षाने जाणीव सहभागी जलयोद्ध्यांना करून देण्यात आली. आपण आपला शब्द पाळला नाही, तर लोकांचा आपल्यावरचा विश्वास कमी होतो. विश्वास संपादन करणे आणि तो टिकविणे म्हणजे नेतृत्व होय. जर शब्द तुटला तर त्याचा आपल्यावर आणि इतरांवर काय परिणाम होतो, त्याची भरपाई कशी करणार? अशी घटना पुन्हा घडू नये यासाठी पुढे काय काळजी घेणार, याची माहिती कार्यशाळेत जाहीर सांगायची असायची. जे सध्याच्या वर्तमानात अस्तित्वात नाही, ते भविष्य आपण आपल्या शब्दांतून उभे करतो. त्यासाठी आपले शब्द प्रभावी आणि विश्वासार्ह बनविणे, ही त्यासाठीची पूर्वतयारी होती. या तीन महिन्यांत 'मास्टरी ओव्हर सेल्फ' मिळविण्याकडे प्रवास झालाच आणि सोबतच सर्वांची गटबांधणी पक्की झाली. हा गट आपल्या हितासाठी आणि प्रगतीसाठी आहे, ही भावना रुजली.

एका शनिवारी चाळीसगावला अशीच कार्यशाळा नियोजित होती; पण डॉ. चव्हाणांच्या सख्ख्या मेहुण्यांना कॅन्सरमुळे नाशिकला ICU मध्ये ॲडमिट केले होते. ताईजवळ राहायचे की आपण कार्यशाळेसाठी दिलेला शब्द पाळायचा असा प्रश्न तयार झाला. त्याही परिस्थितीत डॉ. चव्हाणांनी ठरल्याप्रमाणे कार्यशाळा घेतली आणि संध्याकाळी परत नाशिकला गेले. दोन दिवसानंतर मेहुण्यांचे निधन झाले. या घटनेमुळे सर्व 'पाच-पाटलांची' या मिशनबद्दलची निष्ठा खूप पक्की झाली. हेमंत मालपुरे यांनी स्वतःची आई वारल्याचं दुःख बाजूला ठेवून १४ व्या दिवशी वाघळी गावामध्ये खोलीकरणाचे काम सुरू केले. आपण दिलेल्या शब्दांप्रती बांधिलकी पाहून गावातले लोक जोडले जाणे स्वाभाविक होते.



वाघळी गावात नदीकाठी हिरव्यागार जुन्या झाडाखाली प्राचीन हेमांडपंथी मंदिराच्या आवारात 'पाच-पाटील' कामाचा आढावा आणि पुढील कामाचे नियोजन करताना...

### जागृतीचे पर्व

दुसऱ्या टप्प्यात लोकांवर काम करायचे होते. डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी या तीन महिन्यांचा कालावधी त्यासाठी देण्यात आला. यामध्ये लोकांच्या मनात आपल्या शब्दांतून जलसमृद्धीची शक्यता निर्माण करणे, त्यांना कार्यप्रवृत्त करणे हा उद्देश होता. यासाठी प्रत्येकाने निवडलेल्या पाच गावांतून एक गावप्रमुख तयार करायचा. त्याला पाच समन्वयक जोडायचे. त्यांनी ३० शेतकऱ्यांचा गट तयार करायचा. हा गट नाला खोलीकरणासाठी निम्मा खर्च तयार करायला तयार असणे आवश्यक होते. ६२ गावांच्या गावप्रमुखांची एक मोठी कार्यशाळा ३० डिसेंबरला डॉ. चव्हाण आणि त्यांच्या सहकाऱ्यांकडून चाळीसगाव येथे आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून पद्मश्री पोपटराव पवार, महाराष्ट्र भूषण अरुणबापू निकम उपस्थित होते. गावात जलसंधारणाचे काम करून किती उंचीपर्यंत पोहोचता येते, याची मूर्तिमंत उदाहरणे दिवसभर गावप्रमुखांसमोर होती. अरुण निकम हे महाराष्ट्र राज्याच्या आदर्श गाव समितीचे अध्यक्ष होते. जलसंधारणाच्या त्यांनी केलेल्या कामांचा अनुभव सर्वांना प्रत्यक्ष ऐकायला मिळाला. पोपटराव पवार यांनी हिवरे बाजार या गावाचा केलेला कायापालट, त्यातील जलसंधारणाचे काम यावर पोटतिडकीने विचार मांडले. एका शेतकऱ्याचा मुलगा गावाची सेवा करत पद्मश्री पुरस्काराच्या उंचीपर्यंत पोहोचतो; किंबहुना त्या पुरस्कारालाच स्वतःच्या कर्तृत्वाने सन्मानित करतो, हे ऐकणे सर्वांसाठी पर्वणी ठरली. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने, वेळेच्या अचूकतेने हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून तालुकाभर या कामाचा प्रसार झाला. तालुक्यात '५०० कोटी लिटर्सचा जलसाठा' तयार करणे, हे ध्येय ठरवण्यात आले. या उपक्रमाचे नाव 'मिशन ५०० कोटी लिटर्स' असे ठेवण्यात आले. तीन महिन्यांत तालुक्यात पिरॅमिडसारखी यंत्रणा उभी करण्याचे निश्चित करण्यात आले. यात पहिली फळी 'पाच-पाटलां'ची होती. दुसऱ्या फळीत ६२ गावप्रमुख होते आणि तिसऱ्या फळीत १८६० शेतकरी जोडायचे होते.

### लोकसहभाग आणि लोकाश्रय

ही यंत्रणा तालुक्यासाठी उभी करून देणे हेच नेतृत्वगुण विकसन होते. याचा वापर कोणीही करावा, अशी मुभा चळवळीत सहभागी झालेल्या सर्व कार्यकर्त्यांनी दिली होती. जो कोणी देणगीदार, संस्था, गावाला पोकलेन मशीन उपलब्ध करून देईल, त्याने त्याचे नाव पेपरमध्ये द्यावे, जाहिरात करावी, श्रेय घ्यावे, त्याला कुणाचीही काहीही हरकत नव्हती. जलयोद्धे यंत्रणा तयार करून देतील, कामाचे नियोजन आणि अंमलबजावणी करून देतील, पोकलेनसाठी प्रतितास साधारण दोन हजार रुपये खर्च



'पाणी' विषयावर चाळीसगाव येथे तालुकास्तरीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. येथूनच लोकांनी लोकांसाठी लोकांकडून चालविलेली चळवळ सुरू झाली.

येतो. त्यासाठी मशीन भाडे म्हणून देणगीदाराने प्रतितास हजार रुपये द्यावेत आणि शेतकऱ्यांनी डिझेलचा खर्च म्हणून प्रतितास हजार रुपये द्यावेत, ड्रायव्हरच्या त्या दिवसाच्या जेवणाची व्यवस्था करावी, अशी ही योजना होती. यामध्ये 'पाच-पाटील', गावप्रमुख यांना कोणतेही मानधन किंवा पगार देण्यात येणार नव्हता. त्यांच्या कोणाच्याही हातात पैसे द्यायचे नव्हते. देणगीदारांनी पोकलेनचे भाडे मशीन मालकाला परस्पर चेकने द्यायचे आणि शेतकऱ्यांनी डिझेलचे पैसे पेट्रोल पंप चालकाला द्यायचे, असा आराखडा होता, त्यामुळे त्यात संपूर्ण पारदर्शकता होती. ठरवूनही कुणाला भ्रष्टाचार करता येणे शक्य नव्हते. जलयोद्ध्यांनी स्वतःची कोणतीही संस्था स्थापन केली नव्हती. वारकरी संप्रदायाप्रमाणे कोणत्याही 'पदाशिवाय, आधाराशिवाय चालणारी चळवळ', अशी ही रचना होती.

वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्रातीलच नाही तर जगातील सर्वांत मोठ्या सामाजिक चळवळींपैकी एक आहे. लाखोंच्या संख्येने दरवर्षी निघणारी वारी हे एक आश्चर्य आहे. याठिकाणी आयोजक, संयोजक कोणी नसतो. कोणी नेता नसतो, ना कोणी कार्यकर्ता. सगळे समान. धर्म, जात, लिंग, वंश असा कोणताच भेद नसतो. स्वयंप्रेरणेने लोक एकत्र येतात. वाजत, गाजत, नाचत दिंड्या काढतात. गावोगावी कीर्तन करतात, लोकजागृती करतात. यात पैसा लागत नाही आणि भ्रष्टाचारही होऊ शकत नाही. तशाच पद्धतीने 'पाण्याची वारी' चाळीसगावच्या गावागावात नेण्याचे काम 'पाच-पाटलांनी' केले. कोणत्याच गावात, कोणत्याच सभेत मानपान, प्रतिष्ठा, व्यासपीठ, सत्कार, अध्यक्ष, प्रमुख पाहुणे हा विषय घेतला नाही. लोकांमध्ये मिसळून, जमिनीवर लोकांसोबत खाली बसून प्रबोधन केले, पाणीप्रश्नाची जाणीव करून दिली. ज्याला काम करायची इच्छा होती त्या प्रत्येकाला कोणताच भेदभाव न करता कामात सहभागी करून घेतले. एकही रुपयाचा मोबदला, मानधन घेतले नाही. उलटप्रसंगी पदरमोड करून कार्यक्रम घडवून आणले. तालुक्यातील लोकांना हे पाण्याचे वारकरी आवडणे साहजिकच होते.

दुसऱ्या टप्प्याच्या या तीन महिन्यांत 'पाच-पाटलां'नी खूप मेहनत घेतली. लोक काय म्हणतील, याचा संकोच न बाळगता, गावोगाव, गल्लोगल्ली जाऊन सभा घेतल्या. लोकांना पाण्याचे महत्त्व सांगितले. कामाची पद्धत समजावून दिली. शंका-कुशंका दूर केल्या. टीकेच्या भडिमाराला 'पाच-पाटील' बळी पडले नाहीत. १६ गावांमध्ये ३० शेतकऱ्यांचे गट तयार करण्यात आले. ज्या गावांमध्ये कमी शेतकरी तयार होते, तिथे मशीन पाठविणे व्यवहार्य नव्हते. ते पुढच्या वर्षात घेऊ असे ठरले.

### पक्षनिरपेक्ष काम

तिसरा टप्पा हा कामाच्या जमिनीवरील अंमलबजावणीचा होता. मार्च, एप्रिल आणि मे महिन्यांत काम करायचे होते. १५ मार्च रोजी पातोंडे गावापासून शेतकऱ्यांच्या हस्ते आणि आमदारांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. तालुक्याचे आमदार मंगेश चव्हाण यांनी मोठ्या मनाने लागेल ती मदत करण्याचे जाहीर केले. ही फार मोठी गोष्ट होती. एकामागून एक गावे सहभागी होत होती; पण हे काम आमदार आणि भाजपकडे झुकले आहे, असा समज होऊ लागला होता. तेव्हा तालुक्याचे राष्ट्रवादीचे नेते प्रदीपदादा देशमुख यांनी त्यांच्या गावात तळेगाव येथे काम सुरू केले. शिवसेनेचे तालुकाप्रमुख भीमराव खलाने यांच्या दहिवद गावात आणि काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अनिल निकम यांच्या धामणगावातसुद्धा काम झाले. आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष तुषार निकम स्वतःच पाच गावांची



ब्राम्हणशेवगे गावात पाहणी करताना शेतकऱ्याने कृतज्ञतापूर्वक झेंडूची रोपे दिली. अगदी पायातील चप्पलही काढून ठेवली. मनापासून, आपुलकीने दिलेली ही अमूल्य भेट, खूप भावली.




६२ गावातील जलयोद्ध्यांना मार्गदर्शन करताना डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण, महाराष्ट्र भूषण अरुणबापू निकम आणि पद्मश्री पोपटराव पवार.

जबाबदारी घेणारे 'पाच-पाटील' होते. त्यामुळे राजकीयदृष्ट्या ही चळवळ पक्षनिरपेक्ष ठरली आणि तिसऱ्या टप्प्यात गावागावात काम करणे सोपे झाले, अन्यथा राजकीय आणि जातीय समीकरणातून मार्ग काढणे हे सर्वांत मोठे आव्हान होऊन बसते. नेते जरी समजूतदार असले तरी त्यांचे कार्यकर्ते हे काम होऊ देतीलच हे सांगता येत नाही. तरीही भावकीच्या, रस्त्यांच्या अनेक भांडणांतून 'पाच-पाटलां'नी आणि गावप्रमुखांनी समन्वयाने तोडगा काढून १६ गावांत काम पूर्णत्वास नेले. यात धामणगाव, रांजणगाव, लोंजे, ब्राम्हणशेवगे, नाईक नगर, तळेगाव, वाघळी, कुंझर, पळासरे, भऊर, दडपिंप्री, पातोंडे, बोरखेडा, तळोदे, दहिवद, दस्केबर्डी या गावांचा समावेश होता.

### सामाजिक संस्थांची मदत

भारतीय जैन संघटना, रोटरी क्लब, सकाळ रिलीफ फंड या सामाजिक संस्थांनी या चळवळीला पाठबळ दिले. त्यांनी जितक्या रकमेचे मशिनभाडे उपलब्ध करून दिले, त्यापेक्षा जास्त खर्च शेतकऱ्यांनी लोकसहभागातून केला. त्यामुळे देणगीदार संस्थाही समाधानी होत्या. प्रत्येक गावाचे आणि तालुक्याचे व्हॉट्सअप ग्रुप तयार करण्यात आले. यात रोजच्या कामाचे फोटो शेतकरी, गावप्रमुख उत्साहाने टाकत होते, त्यामुळे संस्थांनाही नेमके काय चालले आहे ते कळत होते. काम करीत असलेल्या गावांचे फोटो पाहून इतर गावांनाही कामाचा हुरूप येत होता. सामाजिक संस्थांसाठी गावपातळीवर उतरून लोकसहभाग घडवून आणणे, लोकांकडून निम्मा खर्च घडवून आणणे हे सर्वांत कठीण काम असते. स्थानिक लोकांनी पुढाकार घेतल्याशिवाय लोकांचे संघटन, कामाचे नियोजन, पैशाचे व्यवस्थापन करणे दुरापास्त असते. स्थानिक गरजा, अडचणी या गावांतील लोकांना सगळ्यात चांगल्या माहीत असतात. पगारी समन्वयक नेमूनही अखंडपणे काम होईलच याची शाश्वती नसते. पैसा किंवा मशीन उपलब्ध करून देणे आणि त्याचा उपयोग व्यवस्थित होत आहे का? याची देखरेख करणे हे त्यामानाने खूप सोपे असते. जेवढे पैसे दिले त्यांच्या दुपटीपेक्षा जास्त काम होत असल्याने अपव्यय, भ्रष्टाचार व्हायचा प्रश्न येत नाही, त्यामुळे सामाजिक संस्था आनंदाने गावांना मदत करीत होत्या.

### एकीचे बळ

कामाचे नियोजन पूर्णपणे शेतकऱ्यांच्या हाती विकेंद्रित करण्यात आले होते. तांत्रिकदृष्ट्या काम चांगले व्हावे, म्हणून शेतकऱ्यांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. फेसबुक लाईव्हद्वारे तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले. शेतकऱ्यांनी नुसतेच पाण्याचे आणि नाला खोलीकरणाचे काम केले असे नाही. व्यासपीठ मिळाल्यावर, संधी मिळाल्यावर लोकसहभागातून काय काय छान आणि समाजोपयोगी काम करता येते, हे दाखवून दिले. सर्व १६ गावे मिळून जवळपास १० किलोमीटर लांबीचे शेतरस्ते बनविण्यात आले. ज्यांचा सरकारी खर्च अंदाजे ६०-७० लाख रुपये आला असता. या रस्त्यांचे प्रश्न कित्येक पिढ्यांपासून प्रलंबित होते. त्याला कोणत्याच सरकारी योजनेत उत्तर सापडत नव्हते. उदाहरणच द्यायचे झाले, तर दस्केबर्डी गावात भिल्ल समाजाच्या लोकांचे शेतरस्ते इतके वाईट होते की, पावसाळ्यात बैलगाडीच काय चालणेही कठीण होते. त्यांना बियाणे, खते, कीटकनाशके, धान्याची पोती, कापूस वाहायचा म्हटला तर सहा किलोमीटरचा वळसा घालून जावे लागत असे. या लोकचळवळीत लोकांनी जवळपास २ किलोमीटरचा रस्ता लोकसहभागातून तयार केला. याचा आनंद सांगताना अपंग शेतकरी अशोक गोकुळ यांचे डोळे भरून आले. लोकसहभागातून



प्रश्न सोडविण्याचे उदाहरण पळासरे गावात तयार झाले. पळासरे येथे दहा वर्षांपासून धरणाचा बांध फुटला होता. शासकीय योजनेतून हे काम होत नव्हते. लोकांची मागणी आणि इच्छा होती. 'मिशन ५०० कोटी जलसाठा' चळवळीअंतर्गत गावाला पोकलेन मशीन उपलब्ध झाले. याच्या सहाय्याने लोकांनी फुटलेला बांध दुरुस्त केला. त्याला श्रमदानातून दगडांची व्यवस्थित पिचिंग केली. यातून ५ कोटी लिटर्सचा पाणीसाठा उपलब्ध झाला. अशाच पद्धतीने लोंजे येथे धरणातून ३८०० ट्रॅक्टर्स गाळ काढण्यात आला. ब्राम्हणशेवगे नाईकनगर येथे भूपृष्ठावर १४ कोटी लिटर्सचा जलसाठा करण्यात आला. ही गावे आता एका पिढीसाठी टँकरमुक्त होतील. १६ गावांत मिळून आता '१०२ कोटी लिटर्स पाणीसाठा' झाला आहे. आतापर्यंत जवळपास ५ वेळा पाऊस पडून १०२ गुणिले पाच म्हणजेच ५०० कोटी लिटर्स पाणी जमिनीत मुरले आहे. या सर्व गावांतील भूजलपातळी वाढून विहिरींना जमिनीपासून ५–७ फुटांपर्यंत पाणी आले आहे. खरिपाचा हंगाम येईल याची शाश्वती आहेच आणि रब्बीचाही हंगाम घेता येणार आहे, इतकी पाण्याची मुबलकता आहे. अशाच पद्धतीने स्नेहालय या संस्थेने आणि गुणवंत सोनावणे यांनी गावात खूप चांगले काम केले आहे.

### वाढलेला सामूहिक आत्मविश्वास

१६ गावांतील जवळपास ३० ते ३५ हजार शेतकरी, गावप्रमुख, 'पाच–पाटील' यांचा आत्मविश्वास आता वाढला आहे. 'जलमित्र परिवार' या फेसबुक पेजवर 'पाच–पाटलां'नी आपल्या कामाचा आढावा व्हिडिओच्या माध्यमातून मांडला. यातून संपूर्ण तालुक्यात कामाची उत्सुकता निर्माण झाली. पुढच्या वर्षासाठी लोक स्वतःहून कामाची तयारी दाखवीत आहेत. लोकांनी स्वतःचे पैसे खर्च करून कामे करून घेतली, यामुळे झालेल्या पाण्याच्या साठ्यावर त्यांची मालकी, आपुलकी निर्माण झाली. हे काम टिकावे म्हणून शेतकरी दगडाचे पिचिंग स्वतः करीत आहेत. या बंधाऱ्यांच्या काठावर झाडे लावत आहेत.

७३ व्या घटना दुरुस्तीनंतर 'पंचायती राज' संस्थांना २९ विषयांची जबाबदारी देण्यात आली आहे. 'जलसंधारण' हा यापैकी एक महत्त्वाचा विषय आहे; परंतु याच्या अंमलबजावणीबाबत बऱ्याच अडचणी आहेत. निधीची कमतरता प्रशासनाचे औदासीन्य यापेक्षा मोठी अडचण म्हणजे 'लोकसहभागाचा अभाव' ही आहे. लोक यासाठी प्रशिक्षित नाहीत. सर्वांना एका प्रश्नासाठी एकत्र येणे, चर्चा करणे, उपाय शोधणे आणि तो अमलात आणणे यासाठी ग्रामसभा असतात; पण बऱ्याच वेळा त्यात बहुतांश लोक सहभागी होतच नाहीत. स्त्रियांचा सहभाग नसतो. ग्रामसभेत भांडणे होतात. काही मूठभर लोकच इतरांवर वर्चस्व गाजवतात. लोकसहभाग होत नाही तर लोक सहयोग घडत नाही, त्यामुळे खर्च वाढतो. मूठभर लोक निर्णय घेत असल्याने पारदर्शकता टिकत नाही, निधीचा अपव्यय होतो. यावर उपाय म्हणजे तळागाळापर्यंत लोकशाही रुजविणे. पाण्याच्या लोकचळवळीतून फक्त पाण्याचे, बंधाऱ्यांचे, रस्त्यांचेच काम होते असे नाही, तर या माध्यमातून लोकांच्या प्रशिक्षणाचे फार मोठे काम होत आहे. यातून चर्चेद्वारे प्रश्न सोडविण्याचा पायंडा पडत आहे. महिला 'पाच–पाटील' जेव्हा गावागावात जाऊन प्रबोधन करतात, आत्मविश्वासाने सहभाग घेतात, तेव्हा खेड्यातील लहान मुलींवर आपोआप आत्मविश्वासाचे संस्कार होतात.

वारकऱ्यांनी अध्यात्मात लोकशाही आणली. तिला धार्मिक चौकटीतून बाहेर काढून सामाजिक क्षेत्रात, लोकांच्या रोजच्या व्यवहारात उतरविण्याचे काम हे 'मिशन ५०० कोटी लिटर्स' करीत आहे. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकानुकंपाय' अशा पद्धतीने लोकांना एक सामाजिक व्यासपीठ उपलब्ध होत आहे. गावागावांतल्या तरुणांची ऊर्जा सकारात्मक कामाकडे वळत आहे. या कामातून होणारे बंधारे, विहिरींना पाणी उपलब्ध करून उत्पन्न वाढवत आहेत. शेतकऱ्यांनी केलेला खर्च पहिल्याच हंगामात वसूल होतो. त्यामुळे 'सहकार्यातून समृद्धीकडे' जाता येते, हे लोकांना अनुभवाने, आत्मविश्वासाने सांगता येत आहे...




# जल अभियानातून समाज परिवर्तन!

**शिक्षक हा समाजातला महत्त्वाचा घटक. भावी पिढ्यांची जडणघडण शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली होत असल्यामुळे नागरिकांचा शिक्षकांवर विश्वास अधिक असतो. या शिक्षकांनी एखाद्या मोहिमेत, चळवळीत सहभाग घेतला तर खूप मोठे बदल घडू शकतात. चाळीसगावच्या जलक्रांतीत धामणगावच्या तुषार निकम या शिक्षकांचे जलक्रांतीतील योगदान असेच नोंद घेण्यासारखे आहे.**

तुषार निकम चाळीसगाव तालुक्यातले धामणगावचे. याच गावात ते लहानाचे मोठे झाले. सध्या निकम हे चाळीसगाव तालुक्यातील पातोंडे येथील माध्यमिक शाळेत उपशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते इतिहासाचे शिक्षक आहेत. साहजिकच जगभरातील चळवळी, उठाव, क्रांत्या, विविध पक्ष, संप्रदाय या विषयांचा त्यांचा अभ्यास दांडगा आहे. ज्या क्रांतिकारकांनी, समाजसेवकांनी तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी आणि त्यांची साथ देणाऱ्या मावळ्यांनी मोठा त्याग केला, त्याप्रमाणे आपणही आपल्या धामणगावसाठी काहीतरी करावे, असे त्यांना नेहमी वाटायचे; पण तशी संधीच मिळत नव्हती.

२०१८ साली त्यांचे भाचे अंमलबजावणी (ईडी) संचालनालयाचे उपसंचालक डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी धामणगाव येथे १० लाख लिटर्स जलसाठा करण्याचे लक्ष्य ठेवून जनजागृती अभियान हाती घेतले. गाव पूर्ण जलसाक्षर होण्यासाठी त्यांच्यासोबत २१ चौकसभा घेतल्या. धामणगावात 'मनसंधारणातून जलसंधारण' करण्याचे काम सुरू ठेवले. त्यासाठी पाणी या क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना आणि तज्ज्ञांना धामणगावात मार्गदर्शन करण्यासाठी निमंत्रित केले.

त्यांच्यासोबत पंकज पवार, सुनील पवार, अविनाश निकम, राकेश जगताप, स्वप्निल जगताप, बी. टी. निकम, सुभाष निकम, रमेश निकम, डॉ. दीपक निकम, विजय शितोळे, चंद्रकांत निकम, सचिन पवार, हेमंत निकम, असे अनेक तरुण धामणगाव 'जलसाक्षर' करण्याच्या मोहिमेत सहभागी झाले. अविनाश निकम आणि राकेश जगताप हे तरुण, तर दर पंधरा दिवसांनी बडोद्याहून या मोहिमेत सहभागी होण्यासाठी येत होते. तो काळ असा होता की, धामणगावात फक्त आणि फक्त पाणी बचतीची चर्चा होत होती. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी सांगावे आणि लोकांनी ऐकावे. असे वातावरण निर्माण झाले होते, त्यामुळे डॉ. चव्हाण यांचाही विश्वास वाढला होता.

धामणगावसाठी ८० लाख रुपये जलयुक्त शिवार योजनेतून मंजूर झाले होते. यातून काम पूर्ण होत नव्हते म्हणून सिद्धिविनायक

ट्रस्टनेही ४० लाख रुपये मंजूर केले. आर्थिक पाठबळामुळे मोहिमेला जोर आला होता; पण प्रत्येक गावात जे घडते तेच धामणगावातही थोड्याफार फरकाने घडले आणि मोहिमेत राजकारणाने खोडा घालण्याचा प्रयत्न केला.

काही लोकांनी कामाला विरोध करून ही कामे आपणच केली आहेत, असा दावा करण्यास सुरुवात केली. कृषी सहायक, कृषी अधिकारी यांच्यावर दबाव आणून कामांचे श्रेय घेण्यास सुरुवात केली. मनमानी करून, लोकांची दिशाभूल करून सारी कामे हातात घेतली. सरकारी योजना, अधिकारी आणि राजकारणी यांची युती झाली तर काय होते, याचा अनुभव इथेही आला.

जलयुक्त शिवार योजनेतून कामे झाली; परंतु बरीच कामे राहिल्यामुळे सिद्धिविनायक ट्रस्टकडून कामासाठी निधी उपलब्ध झाला. त्यावेळीही अशाच राजकीय अडचणी आल्या. समज –गैरसमजातून वाद निर्माण होण्याची शक्यता वाढल्याने चळवळीत सहभागी झालेल्या लोकांनी शांत राहणे पसंत केले. परिणामी विरोधकांचे बळ वाढले. राजकारण, पैशासाठी भांडणे यामुळे १८ लाखांचा निधी न वापरता परत पाठवावा लागला. सगळे निधी संपले हे पाहून जे शेतकरी सभांना आले होते, नियोजनात सहभागी झाले होते, त्यांचे काम कसे झालेच नाही, लोकसहभागाने अशी कामे होत नसतात अशा चर्चांना ऊत आणण्यात आला. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण मुंबईत आणि निकम सर चाळीसगावला होते. मात्र, या दोघांना साथ देणाऱ्या तरुणांना ट्रोल करणे सुरू झाले.

अशा निराशादायी वातावरणात हार न मानता अजून कुठून मदत मिळते का? हे शोधण्यात आले. सकाळ रिलीफ फंड व तनिष्का ग्रुपच्या माध्यमातून २ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला. पोकलेन मालकाशी चर्चा करून प्रतितास २ हजार रुपये दर ठरविण्यात आला आणि पंकज पवार यांच्या नेतृत्वाखाली काम सुरू झाले.

शेतकऱ्यांना एकत्र आणणे, अनुक्रमांक ठरवून देणे अशी कामे सुरू झाली. स्वप्निल जगताप या तरुणाने तर मशीनजवळ झोपून कुणी मशीनला हानी पोहोचवू नये, याची खबरदारी घेतली. २ लाख रुपयांतून नाला खोलीकरण आणि रुंदीकरण काम पूर्ण झाले. या कामांचे परीक्षण करण्यासाठी 'सकाळ'चे संपादक अमोल भट, आनंद शिंपी, दीपक कच्छवा आणि इतरांनी भेट दिली. या कामाने प्रभावित झालेल्या या टीमने पुढील कामांसाठी आणखी ८ लाख रुपये मंजूर केले. साहजिकच या कामांचे मोठ्या प्रमाणात कौतुक झाले. व्हॉट्सअप, फेसबुक अशा सोशल मीडियावर कामांना प्रसिद्धी मिळाली आणि विरोधकांचा विरोधही शांत होऊ लागला. चळवळीतल्या मंडळींनी कोणत्याही राजकारणाकडे लक्ष न देता विधायक कामांवर लक्ष केंद्रित केले. त्यामुळेच जिथे १० लाख लिटर्सचे लक्ष्य होते, तिथे प्रत्यक्षात १४ कोटी लिटर्स साध्य झाले. ज्यांची कामे झाली ते शेतकरी खूश आहेत. त्यांना या कामांचा फायदाही झाला आहे.

डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार चळवळीतल्या सर्वच कार्यकर्त्यांनी कुणाशीही स्पर्धा केली नाही. जिथे वाद व्हायचे तिथे शांतपणे माघार घ्यायची. भांडणे करायची नाहीत. तर फक्त कामांवर लक्ष्य केंद्रित करण्यात आले आणि कामे आनंद मिळविण्यासाठी केली जात होती.



**तळेगाव येथे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रदीपदादा देशमुख यांच्या हस्ते निकम सरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण, प्राचार्य डॉ. एस. आर. जाधव उपस्थित होते.**

> या कामातून समाजाचे फायदे झालेच शिवाय आम्हालाही वेगळी ओळख मिळाली. मी शिक्षकांमध्ये प्रशिक्षण आणि संघटनेच्या कामातून प्रसिद्ध होतोच जलसंधारणाच्या कामाच्या माध्यमातून ही नवी ओळख मिळाली. स्वतःला स्वतःचा अभिमान वाटावा, असे ते क्षण होते.

पावसाळा सुरू झाला. पहिलाच पाऊस एवढा जबरदस्त झाला की, खोलीकरण केलेले सर्व नाले तुडुंब भरले. दैनिक 'सकाळ'ने या बातमीला 'धामणगावची उज्ज्वलक्रांती' या शीर्षकाखाली राज्यभर प्रसिद्धी दिली. धामणगावचे अनेक लोक नोकरी आणि व्यवसायानिमित्त राज्यभर विखुरलेले आहेत. त्यांना ही बातमी वाचून आनंद झाला. त्यांनी या बातमीची कात्रणे व्हॉट्सअप, फेसबुकवर शेअर केली. गावाचे नाव राज्यभर झाल्याचा आनंद होताच, शिवाय या प्रसिद्धीमुळे आत्मविश्वास दुणावल्याचे निकम सर आवर्जून सांगतात.

या चळवळीत काम करताना अनेक गोष्टी लक्षात आल्या. त्यातली सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी की, आपले लोक प्रशिक्षित नाहीत. त्यांना त्यांच्याच फायद्याच्या गोष्टी खूपवेळा समजावून सांगाव्या लागतात. लोक खूप शिकले आहेत; पण मी आणि माझे



तळेगाव येथे जलपूजनानंतर संवाद साधताना...

कुटुंब यापलीकडे पाहण्याची आजही अनेकांची तयारी नाही.

जलक्रांती आणि वाचनालय अशा लोकोपयोगी उपक्रमानंतर आणखी नवे उपक्रम धामणगावात सुरू करण्यात आले. धामणगावचे अनेक सुपुत्र देशाच्या प्रत्येक संरक्षण दलात कार्यरत आहेत. लष्कर, सीमा सुरक्षा दल, पोलीस अशा विविध दलात कार्यरत असलेल्या तसेच निवृत्त झालेल्या जवानांचा सत्कार करण्याची कल्पना डॉ. चव्हाण यांनी मांडली आणि धामणगावच्या लोकांनी ५ हजार, २ हजार, १ हजार आणि ५०० रुपये याप्रमाणे वर्गणी काढली. सर्व वीरपुत्रांचा त्यांच्या कुटुंबीयांच्या उपस्थितीत भव्य सत्कार करण्यात आला. मातृभूमीत आई-वडिलांच्या उपस्थितीत झालेल्या गौरवाने प्रत्येक सत्कारार्थी कृतकृत्य झाल्याचे लहान-थोरांनी पाहिले. याच कार्यक्रमात संपूर्ण धामणगाव देशभक्तिपर गीतांनी दुमदुमून गेले, असेही निकम सर अभिमानाने सांगतात.

धामणगाव येथे अशी चौफेर कामे सुरू असतानाच अन्य ५ गावांतही विकासाची कामे झपाट्याने सुरू होती. त्यात रांजणगाव हे डॉ. चव्हाण यांचे गाव. त्यांचे आतेभाऊ शेखर निंबाळकर यांच्या पत्नी या गावच्या सरपंच, त्यामुळे डॉ. चव्हाण यांना या गावातून राजकीय आणि सामाजिक अशा दोन्ही प्रकारचे सहकार्य मिळाले. शिदवाडी, कळमडू, कुंझर आणि वरखेडे ही धामणगावच्या सीमेवरील गावे. या गावांतदेखील 'धामणगाव पॅटर्न'प्रमाणे कामे करण्यात आली. तिथेही लोकचळवळ उभी राहून मोठा जलसाठा निर्माण झाला. या सहा गावांनादेखील सकाळ रिलीफ फंडातून प्रत्येकी २-२ लाख रुपये देण्यात आले. गावांनीही लोकवर्गणीतून प्रत्येकी १ लाख ६० हजार रुपये गोळा करून कामे सुरू केली. कामे लोकसहभागातून असल्यामुळे लोकांकडून नाल्यांची पूर्णपणे काळजी घेतली जाते, असे निकम सर यांचे निरीक्षण आहे.

ही कामे चालू असतानाच २०१८-१९ साली 'पानि फाउंडेशन'ने चाळीसगाव तालुका 'सत्यमेव वॉटर कप' स्पर्धेत समाविष्ट केला. 'पानि फाउंडेशन'शी संपर्क करून आपली टीम सहकार्य करेल असे सांगितले. निकम आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे सहकार्य विनाअट आणि विनावेतन होते. १७ लोकांनी ५-५ गावांची जबाबदारी घेतली. ५ गावांची जबाबदारी घेणाऱ्या व्यक्तीस 'पाच-पाटील' असे संबोधन करून, त्याच नावाने व्हॉट्सअप ग्रुप बनविण्यात आला. जबाबदारी घेतलेल्या ५ गावांचे अर्ज भरून आणणे, गाव स्पर्धेत उतरविणे, स्त्री-पुरुषांना प्रशिक्षणासाठी पाठविणे, गावात श्रमदानाचे आयोजन करणे, अशी अनेक कामे 'पाच-पाटलां'नी मनापासून केली. 'पानि फाउंडेशन'च्या स्पर्धेत जास्तीत जास्त गावे समाविष्ट करणाऱ्या तालुक्यांमध्ये चाळीसगाव तालुका अग्रगण्य ठरला. श्रमदान हे केवळ गावातल्या गावात न होता गावागावांत झाले, त्यामुळे तालुक्यात खेळीमेळीचे वातावरण निर्माण झाले. अनेक गावांमधला तणाव कमी झाला. स्पर्धा शांततेत आणि निकोप झालीच; पण शेवटच्या दिवसापर्यंत अनेक गावांनी विजयासाठी झुंज दिली.

निकम सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २०१८-१९ या

## जलक्रांतीपलीकडे

*जलक्रांती यशस्वी झाल्यावर गावात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र असावे, अशी मागणी जोर धरू लागली. त्यातून गावकऱ्यांच्या देणगीतून गावात वाचनालय सुरू झाले. त्या वाचनालयाचा फायदा तरुण-तरुणी, आबालवृद्ध घेत आहेत. हे वाचनालय पुढची १० वर्षे सुरू राहील, याचे नियोजन आजच करण्यात आले आहे. यातून निकम सर व त्यांच्या सहकाऱ्यांना आनंद मिळू लागला, गावकरीही नव्या उपक्रमांचे कौतुक करू लागले.*




**चाळीसगाव तालुक्यातील जुनोने येथे ज्या ग्रामस्थांनी शोषखड्डे बनवून घेतले. त्यांच्यासमवेत डॉ. विनोद कोतकर, सुनील चव्हाण आणि निकम सर.**

वर्षात अनेक कामे केली. त्यामागे डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शन व धामणगावातील कामांचा अनुभव असल्याने सर्वांनीच झोकून देऊन काम केले आणि त्यातून प्रेरणा घेऊन तालुकाभरातील सर्व लोक झोकून देऊन काम करू लागले.

'पानि फाउंडेशन' स्पर्धा संपत आली असताना त्याचाच एक भाग म्हणून गावांना पाणी बचतीचे महत्त्व सांगण्याचा निर्णय निकम सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतला. पळणाऱ्या पाण्याला चालायला लावा, चालणाऱ्या पाण्याला थांबवा व थांबलेले पाणी जिरवा, अशी संकल्पना होती. पाण्याचे महत्त्व खेड्यांसाठीच आहे का? शहरांनीही त्यात महत्त्वाची भूमिका बजावली पाहिजे, हे जनतेला कळावे यासाठी निकम सरांनी प्रोजेक्टर व ध्वनियंत्रणा विकत घेतली आणि आपले सहकारी सचिन राणे व रवींद्र वाघ यांना सोबत घेऊन चाळीसगाव शहरात २७ चौक सभा घेतल्या. शहराच्या गल्लीबोळात, चौकाचौकात पाणी बचत आणि शोषखड्डा निर्मितीच्या क्लिप्स दाखविल्या. त्याचे फोटो काढून व्हॉट्सअप आणि फेसबुकवर प्रसिद्धी दिली, त्यामुळे लोक स्वतःहून आमच्या कॉलनीतही असा कार्यक्रम घ्या, अशी विनंती करू लागले. चाळीसगावनगर पालिकेचे मुख्याधिकारी अनिकेत मानोरकर यांनी कार्यालयात बोलावून या उपक्रमाचे कौतुक केले.

मुख्याधिकाऱ्यांनी त्यांच्या बंगल्यात निकम सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांमार्फत शोषखड्डा तयार करून घेतला. त्या कामाची चित्रफीत काढून असे काम करण्याचे आवाहन चाळीसगावच्या नागरिकांना केले. ती क्लिप मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. आम्ही खड्डे खोदायला तयार आहोत; पण खोदणारा, डबरवाला, प्लम्बर असे लोक कुठून आणायचे, असा प्रश्न लोक विचारू लागले. त्याच्यावरही निकम सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तोडगा काढला. धामणगावातीलच अनिल गायकवाड या एम.ए., बी.एड्. झालेल्या व रोजगाराच्या शोधात असलेल्या तरुणाला शोषखड्डा बनविणारी टीम तयार करण्यास सांगण्यात आले. त्यांनी अशी टीम तयार करून नाममात्र रक्कम आकारून शोषखड्डा करून देण्यास सुरुवात केली. या कामालाही सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळाली व अनिल गायकवाड दिवसाला ५-१० शोषखड्डे करून देऊ लागले. मुख्याधिकाऱ्यांचे अनुकरण करीत तालुक्यातील प्रसिद्ध स्त्री रोगतज्ज्ञ डॉ. विनोद कोतकर यांनी तालुक्यातील टोकाचे जुनोने हे गाव निवडून निकम सर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून जनजागृती केली. डॉ. कोतकर यांच्या माध्यमातून या गावात १३८ शोषखड्डे करण्यात आले.

## शोषखड्ड्यांचे जाळे

- चाळीसगाव तालुक्यात जलसंवर्धन चळवळीने जोर धरला. शोषखड्डे हा परवलीचा शब्द झाला. डॉ. सुजित वाघ, डॉ. सारंग पाटील असे नामवंत डॉक्टरही सहभागी झाले. चाळीसगाव रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप देशमुख यांनी क्लबच्या माध्यमातून शोषखड्डे करून देण्याचे ठरविले. चमत्कार असा झाला की, शहरभर ३८० शोषखड्डे तयार झाले. निकम सर व त्यांच्या टीमच्या अपरोक्ष झालेले खड्डे वेगळेच होते.
- या शोषखड्ड्यांचे महत्त्व वेगळेच होते. एक कुटुंब दिवसाला साधारण ३०० लिटर पाणी सांडत असेल, तर एक महिन्याला ९००० लिटर आणि वर्षाला १ लाख ८ हजार लिटर पाणी सांडते. याप्रमाणे ३८० कुटुंबांचे ४ कोटी १० लाख ४० हजार लिटर पाणी या शोषखड्ड्यांच्या माध्यमातून जमिनीत मुरविण्यात आले.



चाळीसगाव शहरामध्ये 'झाडांच्या भिशी'चा उपक्रम राबविला. यांतर्गत प्रत्येकी ६ झाडे लावण्यात आली.

२०१९-२० मध्ये चाळीसगाव तालुक्याने 'पानि फाउंडेशन'च्या वॉटर कप स्पर्धेत भाग घेतला नव्हता, त्यामुळे गेल्यावर्षी 'पानि फाउंडेशन'च्या माध्यमातून केलेली जागृती वाया जाणार की काय, असा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली २ जून २०१९ रोजी तालुक्यातील सर्व जलयोद्धे, पर्यावरणप्रेमी, वृक्षप्रेमी आणि मागील वर्षाचा आढावा घेण्यासाठी बैठक घेण्यात आली. त्यात आतापर्यंत आलेले कडूगोड अनुभव सगळ्यांनी सांगितले. त्यातून काही नाउमेद झाले तर काहींनी यावर्षी काम सुरू झाले तर त्यात झोकून देण्याची तयारी दर्शविली. 'पानि फाउंडेशन'ला बाहेरून मदत करताना सामाजिक कार्यात आपण प्रशिक्षित नसल्यामुळे आपल्याला अपयश आले, अशी भावना काहींनी व्यक्त केली. त्यातूनच डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी 'व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्वगुण विकास' हा उपक्रम राबविण्याचे निश्चित केले. दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी आणि रविवारी सकाळी ९-५ या वेळेत हे प्रशिक्षणवर्ग सुरू झाले.

या प्रशिक्षणवर्गाला स्वतः निकम सर, शेखर निंबाळकर, सचिन राणे, प्रा. आर. एम. पाटील, शशांक अहिरे, डॉ. पंकज पाटील, पंकज पवार, हेमंत मालपुरे, एकनाथ माळतकर, आरस्ता माळतकर, नगरसेविका सरिता राजपूत, रवींद्र वाघ असे १२ (पाच-पाटील)जण प्रशिक्षण घेऊ लागले. वेळेचे नियोजन, शब्दांचे पालन आदी गुण अंगी बाणवू लागले. दर शुक्रवारी कॉन्फरन्स कॉलवर चर्चा होऊ लागल्या. आठवडाभर केलेल्या कामांची, उपाययोजनांची आणि अंमलबजावणीची चर्चादेखील होऊ लागली. त्यामुळे चांगल्या विचारांना संधी मिळाली.

या 'पाच-पाटलां'पैकी काहीजणांना भाषण करता येत नव्हते; पण व्यक्तिमत्त्व विकासाच्या माध्यमातून सगळे 'पाच-पाटील' चांगलं बोलू लागले. त्यानंतर डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी सर्वांना पाच पाच गावांची जबाबदारी दिली. त्या त्या पाच गावांत हे 'पाच-पाटील' जागृती करू लागले. गावकऱ्यांना 'पाणी' या विषयावर खिळवून ठेवू लागले. त्यातून लोकांच्या मनात विश्वास निर्माण झाला. आपले प्रश्न घेऊन एक माणूस येत आहे, तर आपल्याला त्याच्यापर्यंत जायला काय हरकत आहे, अशी भावना गावागावात निर्माण झाली. लोक एकत्र येऊ लागले. व्यक्तिमत्त्व विकासाचा उपक्रम ६ महिने अखंड सुरू होता. 'पाच-पाटील' गावागावांत जाऊन टीम उभारत. येणाऱ्या अडचणींवर बैठकीत चर्चा करीत आणि त्यावर तोडगादेखील काढत. त्यावर डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण मार्गदर्शन करीत. हा उपक्रम सुरू असतानाच निकम सरांच्या नेतृत्वाखाली या सर्वांनी चाळीसगाव शहरात प्रत्येकी ६ झाडे लावण्याचा आणि जगविण्याचा 'भिशी उपक्रम' सुरू केला. त्यात लिंब, अंजन, वड आदी ऑक्सिजन देणारी झाडे लावून ती जगविण्यात आली. चाळीसगावचा चेहरा-मोहरा बदलून टाकण्याची क्षमता असणारी ही एवढी मोठी कामे सर्वांनी मिळून-मिसळून आणि एकदिलाने केली. त्यातून निखळ आनंद मिळवला, त्यामुळेच आज चाळीसगाव परिसरात या कामाची विशेष ओळख झाली.

या भिशी उपक्रमांतर्गत प्रत्येकी ६ झाडे लावून त्याची जबाबदारी १८ जणांनी घेतली. त्यातही निकम सरांनी ११ झाडांची जबाबदारी घेतली. एक वर्षानंतर म्हणजे ५ जून २०२० रोजी 'जागतिक पर्यावरणदिनी' सर्व झाडांना निकम सर, प्रा. आर. एन. पाटील, सविता राजपूत, शशांक अहिरे, डॉ. सुजित वाघ आणि मोराणकर यांनी भेट दिली असता ११२ झाडांपैकी ९२ झाडे आढळली. आता यावर्षीही २० हजार झाडे लावण्याची मोहीम सुरूच आहे. 'मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा' या अभियानांतर्गत निकम सरांनी जबाबदारी घेतलेल्या ५ गावांपैकी बोरखेडा (पिराचे), तळोंदे दिगर येथे प्रत्येकी १-१ कोटी लिटर्सचा जलसाठा, पातोंडे येथे ४ कोटी लिटर्सचा आणि तळेगाव येथे ९ कोटी लिटर्सचा जलसाठा नालाखोलीकरण आणि रुंदीकरण मोहिमेतून निर्माण झाला आहे.... ग



जलबचतीसाठी शपथ...

# केल्याने होत आहे...

**कोणतीही चळवळ ही लोकसहभागातून आणि लोकाश्रयातून यशस्वी होते. समाजातले अधिकाधिक घटक सहभागी होत जातात तितके चळवळीच्या यशस्वितेचे प्रमाण अधिक असते. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी हाती घेतलेल्या 'मिशन ५०० कोटी लिटर्स' या उपक्रमाचे चळवळीत रूपांतर झाले आणि लोकसहभागातून ती यशस्वी होत आहे. शिक्षक असलेल्या शेखर निंबाळकर यांनी या चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान दिले.**

चाळीसगाव तालुक्यातील रांजणगाव हे अत्यंत प्राचीन आणि ऐतिहासिक गाव आहे. साधारण ५ हजार लोकवस्ती असलेल्या या गावाला भक्कम तटबंदी बुरुज आहे. तालुक्याच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि शैक्षणिक विकासात रांजणगाव अग्रेसर आहे. गावात जलसंधारणाची आणि जलबचतीची कामे झाली; पण भरलेला गाळ, वाढलेल्या कूपनलिका आणि अतिरिक्त वापर यामुळे गावाचा पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत चालला होता. गावातील भूजल पातळी वेगाने खालावत चालली होती.

गावाला जशी ऐतिहासिक परंपरा आहे, तशीच सामाजिक कार्यकर्त्यांचीही परंपरा आहे. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी विविध क्षेत्रांत आपले अनमोल योगदान दिले आहे. शेखर नारायणराव निंबाळकर अशाच कार्यकर्त्यांपैकी एक. पेशाने शिक्षक असलेले निंबाळकर गावातील विविध उपक्रमांत सहभागी असतात. निंबाळकर फाउंडेशन, रांजणगाव या संस्थेच्या माध्यमातून आरोग्य आणि शिक्षणविषयक अनेक उपक्रम त्यांनी गावात राबविले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, डस्टबिन वाटप, महिला सबलीकरण, वृद्धांसाठी तसेच तरुणांसाठी योजना, शासकीय योजनांचा गरजूंना लाभ देणे, अशा विविध उपक्रमांत निंबाळकर यांनी योगदान दिले आहे. त्यामुळेच गावाच्या पाण्याच्या समस्येवर काहीतरी केले पाहिजे, असे त्यांच्या मनाने घेतले होते.

२०१८ साली त्यांच्या पत्नी सोनाली निंबाळकर यांची रांजणगावच्या सरपंचपदी निवड झाली. त्यावेळी पाणीप्रश्न अत्यंत बिकट झाला होता. त्यातच अभिनेते आमिर खान यांच्या 'पानि फाउंडेशन'ची वॉटर कप स्पर्धा सुरू झाली आणि त्यात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाने सहभाग घेतला. निंबाळकर यांचे धामणगाव येथे खूप येणे-जाणे होते. त्यातूनच ते डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या संपर्कात आले. डॉ. चव्हाण यांच्या संकल्पनेतून धामणगाव येथे सुरू असलेली अनेक कामे निंबाळकर पाहात होते. लोकसहभाग आणि सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून जलबचत आणि नाला खोलीकरणाची कामे धामणगावमध्ये झाली होती. त्या प्रकारची कामे आपल्या रांजणगाव येथे व्हावीत, अशी निंबाळकर यांची इच्छा होती.

रांजणगावाने वॉटर कप स्पर्धेत सहभाग घेतला आणि गावात डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या प्रेरणेतून गावसभा घेण्यात आली. त्याला डॉ. उज्ज्वला देवरे, डॉ. विनोद कोतकर, जलमित्र प्रफुल्ल साळुंखे, सचिन पवार, 'पानि फाउंडेशन'चे समन्वयक विजय कोळी व सुनील यांची टीम, डॉ. मनोहर भामरे, जलसाक्षरता अभियानाचे स्वप्निल कोतकर, राष्ट्रीय कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब चव्हाण व प्रा. जे. जी. चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. या गावाचा पाणीप्रश्न कायमचा मिटावा यासाठी चर्चा करून नाला खोलीकरण, शोषखड्डे, बांध बांधणे, चर खोदणे, आदी कामे करावीत, असे निश्चित करण्यात आले.



## जनजागृती ▲

जलसंधारणाच्या अभियानामध्ये सहभाग घेत असताना रांजणगावमध्ये जनजागृतीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. ठिकठिकाणी कॉर्नर सभा तसेच चित्र रथाच्या माध्यमातून लोकजागृती करण्यात आली. त्याचबरोबर जलसंधारणाच्या संकल्पना समजावून देण्यात आल्या.

> डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या माध्यमातून 'मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा' हा उपक्रम 'पाच-पाटील' ग्रुपच्या माध्यमातून तालुक्यात एक मोठी चळवळ ठरली हे मोठे समाधान आहे. आपण आपल्या जीवनात प्रत्येक गोष्टीला महत्त्व देतो. जे चांगले आहे ते साथ देणार आहे आणि जे वाईट आहे, ते अनुभव देणार आहे. आयुष्याच्या महामार्गावर प्रवास करताना नजर नेहमी चांगल्या ध्येयावर राहिली पाहिजे. त्यामुळे यशस्वी होऊ शकते.

पंचायत समिती सदस्य जिभाऊ आधार पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष बाळासाहेब चव्हाण यांच्यासह प्रमोद चव्हाण, प्रदीप सोनावणे, कृषी सहायक चेतन निकम, ग्रामविकास अधिकारी जयवंत येवले, सर्व ग्रामपंचायत सदस्य, भूमिपुत्र आणि ग्रामस्थ यांच्या सल्ल्याने रांजणगाव विकास मंच स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. सोनाली निंबाळकर, प्रमोद चव्हाण, प्रदीप सोनावणे यांना अधिकार देऊन बँकेत खाते काढण्यात आले.

वॉटर कप स्पर्धेचे प्रशिक्षण जवखेडा (ता. अमळनेर) येथे होते. मकरंद नाईक, सोनाली निंबाळकर, सुनीता सूर्यवंशी, सपना सोनावणे, रेखा कुलकर्णी, प्रमोद चव्हाण, गणेश देवरे, ग्रामविकास अधिकारी जयवंत येवले यांनी चार दिवस निवासी प्रशिक्षण घेतले. त्यानंतर गावात कॉर्नर सभा, चित्ररथ यांच्या माध्यमातून पाटोदा, हिवरे बझार


श्रमदान..

येथील संकल्पना समजावून देण्यात आली. ॲड. भरत राठोड यांनी चित्ररथासाठी मदत केली, तर जितेंद्र पाटील यांनी वेळोवेळी मंडप व साऊंड सिस्टिमसाठी सहकार्य केले. गावात शोषखड्डे खोदण्यात आले. डॉ उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी स्वतःच्या घरापुढे स्वतःच शोषखड्डा खोदला आणि इतरांसमोर स्वतःचे उदाहरण निर्माण केले.

### लोकसहभागाची गंगा

निंबाळकर फाउंडेशन, वसुंधरा फाउंडेशन, तनिष्का महिला मंडळ, नोकरीच्या निमित्ताने परदेशी असलेले भूमिपुत्र नवनीत पाटे यांच्यासह अनेकांनी मदत केली. ५ मे २०१९ रोजी गावातील शेतीवर ग्रामस्थांचे मनसंधारण व्हावे यासाठी महाश्रमदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये गावकरी, महिला, तरुण मंडळी यांच्यासह चाळीसगाव तालुक्यातील सिद्धी महिला मंडळ, जिजाऊ महिला समिती, हिरकणी महिला मंडळ, चॅलेंज हॉटेल ग्रुप, जनरल प्रॅक्टिशनर्स, ग्रीन मिशन फाउंडेशन, वसुंधरा फाउंडेशन, आई फाउंडेशन, रोटरी मिलेनियम, जनसाक्षरता अभियान, बॅडमिंटन ग्रुप, स्वीमर्स ग्रुप, मेडिकल डिलर्स ग्रुप, गोपनीय विभाग पोलिस स्टेशन, भक्तिगंध भजनी मंडळ, उन्नती भावगंध भजनी मंडळ, त्रिमूर्ती मंडळ, सूर्योदय ग्रुप, मारुती चौक मित्र मंडळ, संजय चौक मित्र मंडळ, जितेंद्र मंडप सर्व्हिस आदी संस्थांनी श्रमदानात सहभाग घेतला. या








## लोकसहभाग

'मिशन ५०० कोटी लिटर्स' या उपक्रमाला रांजणगावकरांनी उत्स्फूर्त सहभाग दिला. श्रमदानाबरोबरच पोकलेनच्या डिझेलचा खर्चही शेतकऱ्यांनी उचलला आणि आपले योगदान दिले.

माध्यमातून १ हजार घनमीटरचे खोदकाम करण्यात आले. दीपक पाटे, अजित चव्हाण, धनंजय चव्हाण, सारिका चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सोनाली निंबाळकर यांनी तनिष्का महिला मंडळ स्थापन केले. प्रत्येक महिलेने ७०० रुपये याप्रमाणे २२ महिलांचे १५ हजार ४०० रुपये सकाळ रिलीफ फंडाला मदत केली. निंबाळकर फाउंडेशन यांनीही सकाळ रिलीफ फंडाला ७० हजार रुपयांची मदत केली आणि नाला खोलीकरणासाठी 'सकाळ'ने मदत करावी, असा ठराव संमत करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सकाळ रिलीफ फंडाला जलबचतीचे काम करण्यासाठी मदत करावी, असा ठरावही संमत करण्यात आला.

### सकाळ रिलीफ फंडाचे योगदान

सकाळ रिलीफ फंडाने रांजणगावसाठी पोकलेन मशीन दिले. ग्रामस्थांनी उभे राहून कामे करून घेतली. १ हजार रुपये तासाप्रमाणे शेतकऱ्यांनी डिझेल दिले. एकूण २६० तासांचे काम करण्यात आले. लोकसहभागातून शेतकरीवर्गाने २ लाख ६० हजार रुपयांचे डिझेल दिले. 'सकाळ'ने पोकलेन भाड्यासाठी दोन लाख रुपयांची मदत केली. जवळपास ५ ते ६ कोटी लिटर्स जलसाठा तयार झाला. ३५० हेक्टर जमीन ओलिताखाली आली होती. शेतकरी सुखावला. झालेल्या कामात स्वतःच्या सहभागामुळे खूश झाला.

'सकाळ'सह अनेक संस्थांनी शेखर निंबाळकर यांच्यासह १३ जलमित्रांना 'जलयोद्धा' म्हणून सन्मानित केले. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या हस्ते माध्यमिक विद्यालय रांजणगाव येथे पटांगणात वृक्ष लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांकडून ५ ते ६ हजार 'सीड बॉल' तयार करण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

'सकाळ'च्या 'पाऊस पेरू' या उपक्रमाला साथ देत सोनाली निंबाळकर आणि मंगलताई धामणे यांनी गच्चीचे पाणी जमिनीत जिरविले. अशाप्रकारे एक उपक्रम राबविण्यात आला.

### 'पाच-पाटील' पर्व

सप्टेंबर २०१९ पासून डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी १३ जलमित्रांना पंधरा दिवसांनी दर रविवारी मुंबई येथून येऊन प्रशिक्षण दिले. व्यक्तिमत्त्व विकास, जलबचत, सामाजिक जाणीव यांचे मार्गदर्शन करण्यात आले. मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा निर्माण करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. 'पाच-पाटील' ग्रुप तयार करून पाच पाच गावांची जबाबदारी देण्यात आली. शेखर निंबाळकर यांच्यावर रांजणगाव (लोजे, सांगवी, खेरडे, बाण गाव अशी पाच गावांची जबाबदारी देण्यात आली. निंबाळकर यांनी प्रत्येक गावात जाऊन प्रबोधन केले आणि लोकांना विश्वासात घेऊन गावप्रमुखांची नियुक्ती केली.

### रांजणगाव आणि लोजे गावात कामास सुरुवात

रांजणगाव येथे एप्रिल २०२० मध्ये अमजद खान पठाण यांच्या शेताजवळील नाला खोलीकरणाला प्रारंभ करण्यात आला. त्यासाठी रोटरी क्लब ऑफ मुंबई यांची पोकलेन मशीनची मदत झाली. चाळीसगाव रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. संदीप देशमुख यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. गावाच्या पूर्वेच्या दिशेने शिल्लक असलेले नाला खोलीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले, तसेच गावातील अनेक दिवसांचे प्रश्न तसेच शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या पांदी रस्त्यांचे काम लोकसहभागातून माती, गाळ, मुरूम टाकून पूर्ण




'सकाळ रिलिफ फंडा'च्या माध्यमातून करण्यात आलेल्या कामाचे भूमिपूजनप्रसंगी तनिष्का महिला मंडळाच्या सुनीता पाटील, विद्या चव्हाण, सोनाली निंबाळकर, अनिता चव्हाण, सुनीता सूर्यवंशी, सुरेखा पाटील, रेखा कुलकर्णी, कावेरी देवरे, शेरबानो अलीम, प्रतिभा पाटील, अंजली भामरे, सुलभाताई पाटील, संगीता सूर्यवंशी, सीमा चव्हाण, ज्योती मोरे, मुमताज अमजद खान, मंगला पाटील, सपना अहिरे, जब्रिनबी जमीर, सपना सोनवणे, अंजली सोनवणे, मोहिनी कापडणे याबरोबरच डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण, जिभाऊ पाटील, बाळासाहेब चव्हाण, प्रा. तुषार निकम, शेखर निंबाळकर, प्रमोद चव्हाण, प्रदीप सोनवणे, भाऊसाहेब पाटील, संतोष सूर्यवंशी, स्वप्निल चव्हाण, मकरंद नाईक, अनिल चव्हाण, दादा देवरे, गणेश ठाकरे, गणेश देवरे, कचरू गायकवाड, जितुभाऊ पाटील आदी मान्यवर.

करण्यात आले. ३ ते ४ किलोमीटरचे पांदी रस्त्यांचे काम पूर्ण झाले.

या कामांसाठी शेतकऱ्यांनी २ लाख ५५ हजार रुपयांचे डिझेल टाकले. रोटरी क्लब ऑफ मुंबई यांनी पोकलेन भाडे २ लाख रुपये दिले. भारतीय जैन संघटना यांनी जेसीबी उपलब्ध करून दिले आणि या सहभागातून नाला खोलीकरणाचे काम उत्तम झाले. आज या कामामुळे शेतकरी अत्यंत सुखी आहे. या कष्टांना निसर्गानेही साथ दिली. चांगला पाऊस झाला, बंधारे भरले, कालवे वाहू लागले. या कामांच्या माध्यमातून ४ ते ५ कोटी लिटर्स जलसाठा या क्षेत्रात निर्माण झाला आणि एकूण २५० हेक्टर्स जमीन ओलिताखाली आली.

### लोंजे गावात प्रतिसाद

लोंजे गाव चाळीसगावपासून १६ किलोमीटर अंतरावर आहे. गावात ७ किलोमीटर अंतरात ६० ते ७० माती नाला बांध, सिमेंट बंधारे आहेत; पण पाण्याचा मोठा प्रश्न या गावातसुद्धा निर्माण झाला होता. 'मिशन ५०० कोटी लिटर्स' अभियानाच्या माध्यमातून या गावात ग्रामसभा घेण्यात आली. डॉ. संदीप राठोड, ज्योतिभाऊ जाधव, वाडीलाल पवार आदी लोकांनी प्रशिक्षण घेतले. जलबचतीचे धोरण समजून घेतले. आपल्या गावात असे काम कसे उभे करता येईल, याचा अभ्यास केला. ग्रामस्थांनीही त्यांच्या संकल्पनेला पाठिंबा दिला. सकाळ रिलीफ फंडाकडे मदतीची मागणी करण्यात आली. 'सकाळ'च्या माध्यमातून वैशाली राठोड यांनी तनिष्का मंडळ स्थापन केले. जलविकास मंच, लोंजे या संस्थेची स्थापना करण्यात आली.

डॉ. संदीप राठोड, ज्योतिभाऊ जाधव, वाडीलाल पवार आदी लोकांनी जलविकास मंच, लोंजे या संस्थेची जबाबदारी घेतली. लोकउद्धार फाउंडेशनचे भरत पवार, सुरेश पवार, योगेश येवले, यांची या कामात भरीव मदत झाली. आदर्श क्रीडा मंडळाचे गोरख राठोड, रंगराव राठोड, राजेंद्र जाधव यांच्यासह अनेकांची मदत झाली. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुभाष चव्हाण, मोरसिंग राठोड, सरपंच जिजाबाई ताराचंद जाधव, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, नोकरीच्या निमित्ताने बाहेरगावी असलेले भूमिपुत्र यांची मोलाची मदत झाली.

वैशाली राठोड यांच्या तनिष्का मंडळाने प्रत्येकी ७०० रुपये प्रमाणे २० जणांचे १४ हजार रुपये सकाळ रिलीफ फंडमध्ये जमा केले. आणि त्यांच्याकडून नाला खोलीकरणासाठी पोकलेनची मदत मागितली. भारतीय जैन संघाने गावासाठी जेसीबी मशीन दिले. त्यातून गावात शोषखड्डे खोदण्यात आले. धरणातील १७०० ते १८०० ट्रॅक्टर गाळ शेतकऱ्यांनी आपल्या शेतात टाकून घेतला. जलविकास मंच आणि शेतकरी यांनी लोकसहभागातून ४ लाख रुपये डिझेलसाठी दिले. या कामातून या गावात जवळजवळ ८ ते ९ कोटी लिटर्स जलसाठा निर्माण झाला आहे. १७०० ते १८०० ट्रॅक्टर गाळ शेतकऱ्यांच्या शेतात टाकण्यात आला आहे. ३ ते ४ किलोमीटर लांबीचे पाणंद रस्ते तयार करण्यात आले आहेत. तसेच वृक्ष लागवड करण्यात आली आहे. ३५० ते ४०० हेक्टर्स जमीन ओलिताखाली आली आहे.

भरपूर पाऊस झाला, बांध भरले, सिमेंट बांध भरले, धरण भरले, पाणी वाहू लागले. या जल लक्ष्मीमुळे शेतकरी खूश आहे. राहून गेलेले काम पुढील वर्षी घेऊ अशी आस प्रत्येकाला लागली आहे... ग



**'मीरा'च्या वेशातून जनजागृती :** सविता राजपूत यांनी लोकसहभाग वाढावा यासाठी विविध मार्गांचा अवलंब केला. संत मीराच्या वेशभूषेतून त्यांनी घेतलेला सहभाग.



**जलसंधारणाची फलप्राप्ती :** विविध सामाजिक संस्था आणि शेतकऱ्यांच्या योगदानातून पोकलेन व जेसीबीच्या सहाय्याने नाला खोलीकरणाचे काम करण्यात आले. याची ही फलप्राप्ती.

# मनसंधारणातून जलसंधारण..!

**समाजातील सर्व स्तरांतील लोकांनी सार्वजनिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला, तर कोणतेही कार्य सिद्धीस जाण्यास वेळ लागत नाही. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी सुरू केलेल्या 'मिशन ५०० कोटी लिटर्स' या चळवळीतदेखील त्याचा अनुभव आला. शिक्षक असलेल्या सविता राजपूत यांनी या चळवळीत दिलेले योगदान ठळक नोंद घ्यावे असे आहे. 'मनसंधारणातून जलसंधारणाकडे' झालेला त्यांचा प्रवास चाळीसगाव तालुक्यासाठी महत्त्वाचा ठरला आहे.**

सविता सत्यवान राजपूत-जाधव या चाळीसगावच्या. बी.ए., बी.एड्.पर्यंत शिक्षण झालेले. अण्णासाहेब उदेसिंग पवार सर्वोदय आश्रमशाळेत त्या शिक्षिका म्हणून काम करतात. राष्ट्रीय खो खोपटू, बारा वेळा राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक आणि चाळीसगाव नगरपालिकेच्या विद्यमान नगरसेविका असा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आलेख.

शिक्षिका, नगरसेविका असल्यामुळे राजपूत यांचे जीवनमान एकंदर सुखवस्तू अशा प्रकारात मोडणारे. तोशीस म्हणावी तर कसलीच नव्हती; पण आपण समाजाचे काहीतरी देणं लागतो, ही भावना मनात होती. आपण समाजासाठी कार्य करू शकतो, हा विचार सातत्याने त्यांच्या मनात घोळायचा. सारे काही चांगले असूनही काहीतरी चुकते आहे, याची हुरहुर होती; पण जे चुकते आहे, ते नेमके काय आहे, हे





**कॉर्नर सभा** : जलसंधारणाच्या कामामध्ये लोकसहभाग वाढविणे आवश्यक असते. अधिकाधिक लोकांचा सहभाग वाढेल तेवढे काम यशस्वी होते. यासाठी सविता राजपूत यांनी कॉर्नर सभा घेतल्या. लोकांना पाण्याचे महत्त्व सांगितले.

> जगद्गुरू संत तुकोबाराय म्हणतात, 'मन करारे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण।' मोक्ष अथवा बंधन सुख, समाधानी शेतकऱ्यांच्या जीवनात खऱ्या अर्थाने राखत विकासाकडे नेणारे एक क्रांतिकारी जलअभियान ठाणे. गाव शिवारात पडणारे पावसाचे पाणी अडविण्यासाठी गावकऱ्यांची झालेली एकजूट ही अतिशय समाधानाची बाब आहे. पळासरे, चिंचगव्हाण, सुंदरनगर येथे ना भूतो न भविष्यती असे उच्चांकी व आदर्शवत काम झाले.

त्यांना कळत नव्हते.

असाच एकेदिवशी सविता यांना बहिणीचा फोन आला. आपल्याला एका कार्यक्रमासाठी पोलिस ग्राऊंडवर जायचे आहे, असे बहीण म्हणाली. तो कार्यक्रम पाण्यावर आधारित होता. पाण्यावर आधारित पहिलीच चित्रफीत पाहून सविता खूप प्रभावित झाल्या आणि आपण या क्षेत्रात काम करायचे, हे त्यांच्या मनाने निश्चित केले. हा कार्यक्रम 'युगंधरा फाउंडेशन'च्या अध्यक्षा स्मिता बच्छाव आणि हिरकणी महिला मंडळाच्या अध्यक्षा सुचित्रा पाटील यांनी आयोजित केला होता आणि सादरीकरण सुनील पाटील यांनी केले होते.

काही दिवसांनी सुनील पाटील यांनी सविता यांना फोन केला. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण पाणीप्रश्नासंदर्भात बैठक घेणार आहेत, असे त्यांनी सांगितले. एवढा मोठा अधिकारी बैठक घेणार, बैठकीला कसे जायचे, काय बोलायचे, त्यांचा स्वभाव कसा असेल असे प्रश्न सविता यांच्या मनात निर्माण झाले. बैठकीला जाऊच नये, असेही त्यांच्या मनात येऊन गेले; पण पाण्यावर काम करायचे असेल तर जावेच लागेल, असे एका बाजूने वाटत होते. मात्र, प्रत्यक्ष बैठकीला गेल्यावर आणि डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्याशी बोलल्यावर सविता यांचे दडपण कुठल्या कुठे निघून गेले. एवढा मोठा अधिकारी इतका साधा आणि सरळ असू शकतो, हे सविता यांना त्या दिवशी कळले. डॉ. चव्हाण दोन वर्षांपासून पाणीप्रश्नावर काम करीत होते. या बैठकीत सविता यांनी वरखेडे बुद्रुक या गावाची जबाबदारी घेतली.

२०१९ मध्ये पानि फाउंडेशनने आयोजित केलेल्या 'सत्यमेव जयते वॉटर कप' स्पर्धेत सहभाग घेण्यात आला. त्यासाठी जवखेडा येथे ५ दिवसांचे प्रशिक्षणही घेतले. प्रशिक्षणातून सविता यांना खूप काही शिकायला मिळाले आणि एक बोधवाक्य त्यांच्या मनावर बिंबले... 'जल है तो कल है।'

सविता राजपूत आणि त्यांचे सहकारी जोमाने कामाला लागले. स्पर्धा सुरू होण्याआधी जे ३० गुण आवश्यक होते, ते सविता यांच्या गावाला सर्वांत आधी मिळाले. ते मिळविण्यासाठी कृषी अधिकारी अविनाश चंदेले, प्रशांत साळुंखे, विकी महाजन, सविता यांची सहकारी टीम, निखिल राजपूत, साधना पवार, कैलास कावरे, भगवान पगारे आणि गावच्या सरपंच अर्चना पवार या सर्वांनी मदत केली. पहिल्याच टप्प्यात मिळालेल्या यशामुळे वरखेडे बुद्रुक गाव पहिले येईल, अशी खात्री सविता यांना वाटत होती.







## जलसंधारणाची कामे

सविता राजपूत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जनजागृती केली. त्यांच्या व्यापक प्रयत्नांना यश आले आणि लोकांचा सहभाग वाढला. लोक जलसंधारणाच्या कामामध्ये सहभागी होऊ लागले. श्रमदानासाठी उपस्थित राहू लागले. मशीनच्या डिझेलसाठी आर्थिक पाठबळ देऊ लागले. मनसंधारणातून जलसंधारण झाले. कोरडी पडत चाललेली धरणीमाता ओली होऊ लागली. या कामांमुळे जलसाठा वाढू लागला.

त्यानंतर सविता यांनी ठिकठिकाणी कॉर्नर सभा घेऊन पाण्याचे महत्त्व सांगण्यास सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात शोषखड्डे तयार करण्यासाठी कोणीही तयार होत नव्हते. तेव्हा गावातील दिव्यांग मुलगा कैलास कावरे याने स्वतःच स्वतःचे शोषखड्डे तयार करून गावात एक आदर्श निर्माण केला. जलसंधारणामध्ये माथ्यापासून पायथ्यापर्यंत काम कसे करायचे, हे सविता यांनी गावकऱ्यांना समजावून दिले. शिवार फेरीच्या माध्यमातून शाळेतील सर्व शिक्षक बंधू-भगिनी तसेच विद्यार्थ्यांच्या मदतीने शाळेत २ हजार ५०० रोपांची रोपवाटिका तयार केली. आता दोन कामे फार महत्त्वाची होती. श्रमदान आणि यंत्रकाम. श्रमदानासाठी लोकांची गरज होती आणि यंत्रकामासाठी पैशांची. या संपूर्ण कामाची तीच खरी कसोटी होती.

श्रमदानासाठी लागणारी टिकाव, फावडी, टोपली यांसाठी जामदा येथील सुबोध राजपूत यांनी मदत केली. मात्र, श्रमदानासाठी गावातील कोणीही तयार होत नव्हते. लोकांमध्ये कीर्तनाच्या माध्यमातून, वेशभूषांच्या माध्यमातून, सण, उत्सव यांच्या माध्यमातून जनजागृतीचे काम सविता यांनी केले. हे काम करीत असताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. गावात कुणी टिंगलटवाळी करीत असे, तर कुणी काम बंद पाडण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्ष स्पर्धेच्या उद्घाटनाच्या दिवशी गावातील ७००-८०० पुरुष आणि महिला उपस्थित होत्या. ही उपस्थिती पाहून सविता भारावून गेल्या. मात्र, त्यांचा आनंद फार काळ टिकला नाही. नंतर कुणीच आले नाही. स्वतः सविता, निखिल आणि कैलास असे तीघेचजण काम करीत होते. अधून-मधून तांड्यातील विकास राठोड, दादाभाऊ राठोड, जयसिंग राठोड, किशोर राठोड तसेच गावातील भीमसिंग खंडाळे, भिवसन जगताप, जे. बी. आबा, सुरसिंग पवार, राधेशाम जगताप, मंगल पवार, योगेश पवार, सुदाम पाटील, दीपक कछवा, कोमल महाले, शिवाजी पाटील, बंडू पाटील, प्रकाश गवारे ही मंडळी मदतीला येत असत. लोकांचा सहभाग फारच कमी असल्यामुळे श्रमदानाचे प्रमाण खूपच कमी होते.

हे सर्व करीत असताना जलसंधारणाच्या आधी मनसंधारण किती आवश्यक आहे, हे सविता यांच्या लक्षात आले. त्यासाठी त्यांनी झटून प्रयत्न केले. श्रमदानानंतर यांत्रिक कामांसाठी काही लोकांनी मदत केली. त्यात बाबूसिंग कछवा, प्रदीप पवार, निलेश पाटील, बनकर सर, रवींद्र सूर्यवंशी, गोविंदा गवारे, प्रवीण गवारे, अजय पाटील तसेच चाळीसगाव येथील प्रतिष्ठित व्यक्तींनी मदत केली. लक्ष्मणसिंग राजपूत, प्रवीणभाई पटेल, पूनम फरसाण मार्ट, मानसिंग राजपूत, डॉ. सुनीता घाटे, श्रीमती रमाबाई जाधव, प्रशांत राजपूत, प्रदीप राजपूत यांनी मदत केली. यांत्रिक काम पूर्ण करण्यासाठी आणखी मदतीची गरज होती. तेव्हा गावकऱ्यांना डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या माध्यमातून एक आशेचा किरण मिळाला.

डॉ. चव्हाण यांनी सकाळ रिलिफ फंडाची माहिती दिली. त्यातून या उपक्रमाला २ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला. सकाळ रिलिफ फंडासाठी २० महिलांचा बचत गट तयार करण्यासाठी गावच्या सरपंच अर्चना राजपूत आणि गोविंदा राजपूत यांनी प्रयत्न केले. सकाळ रिलिफ फंडाचे रनाळकर, भट यांनी मोलाचे सहकार्य केले.






इतर गावांच्या तुलनेत श्रमदान आणि यंत्रकाम कमी झाल्यामुळे गावाचा नंबर आला नाही, याचे सविता यांना थोडेसे वाईट वाटले; पण झालेले काम पाहून समाधानदेखील वाटले. या स्पर्धेसाठी काम करताना खूप काही शिकण्याची संधी सविता यांना मिळाली. आयुष्यात कधीही विसरता येणार नाहीत असे हे क्षण होते.

या स्पर्धेच्या माध्यमातून सविता यांचा जनसंपर्क प्रचंड वाढला. विजय कोळी, सुनील पाटील, मोरे काका, वाघ सर, निलेश पाटील, माही मॅडम, आकाश पाटील, मनोज हातोरे, प्रतिभा पुरी, जितेंद्र पाटील, बंडू भाऊ, तसेच भक्कमपणे पाठीमागे उभे राहणारे डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण, गुणवंत सोनावणे असे अनेक जलयोद्धे संपर्कात आले. त्यातून सामाजिक काम वाढले. स्पर्धा तर संपली होती, आता पुढे काय ते नंतर बघू, असे म्हणून काम बंद झालेले होते; पण म्हणतात ना, जो थांबला तो संपला. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी जलचळवळीची जी ज्योत पेटविली होती, ती तशीच कायम ठेवण्यासाठी १ सप्टेंबर २०१९ पासून नव्या कामाला सुरुवात झाली.

पाणी नियोजन, क्षमता, नेतृत्व विकसन या माध्यमातून आपण आपले काम कसे चालू ठेवावे, याचा कानमंत्र डॉ. चव्हाण यांनी या चळवळीत सहभागी झालेल्या प्रत्येकाला दिला होता. डॉ. चव्हाण यांनी या कार्यकर्त्यांना आलेले गतवर्षीचे अनुभव ऐकून घेतले. आपल्या कामात कुठे आणि कसा बदल करावा, याची माहिती दिली. आपण आधी तीन महिने स्वतः मेहनत घेतली पाहिजे, असा गुरुमंत्र दिला. आपल्या शब्दात ताकद असली पाहिजे, आपला दृष्टिकोन बदलला तर आयुष्यही बदलेल, खुल्या मनाचा माणूस लवकर विकसित आणि ज्ञानी होतो, हे डॉ. चव्हाण यांनी सर्वांच्या मनावर बिंबविले आणि सुरू झाले 'मिशन ५०० कोटी लिटर्स'.

डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या पुढाकाराने आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या अभियानात 'पाच-पाटील' म्हणून सविता सहभागी झाल्या. त्यांच्याकडे चिंचगव्हाण, सुंदरनगर, पळासरे, दरेगाव, मेहुण पारे, वरखेडे बु।।, तिरपोले, आकोणेतांडा या गावांची जबाबदारी होती. एका बाजूला लॉकडाऊन होता, तर दुसरीकडे 'पाच-पाटील' मात्र गावांमध्ये जनजागृती करीत होते. ग्रामस्थ, शेतकऱ्यांना प्रोत्साहित करीत होते. परिणामी, या अभियानात लोकांचा उत्स्फूर्त सहभाग वाढत होता. चिंचगव्हाणमध्ये अमोल गायकवाड, नवनाथ राठोड, सुनील चव्हाण, दीपक पाटील, मुझाईक शेख हे गावप्रमुख होते. पोकलेनच्या सहाय्याने १३ हजार घनमीटरचे काम झाले. इथला पन्नास वर्षांपूर्वीचा तलाव गाळाने पूर्णपणे भरला होता. त्याला पुनर्जीवित करण्यात आले. पळासरे येथे सरपंच सुवर्णा देवकर, दगडू देवकर, आप्पा हिलाल तिरमली, मिलिंद देवकर, नितीन राजपूत, ज्ञानेश्वर देवकर, बापू तिरमली हे गावप्रमुख होते. नाला खोलीकरण, शेततळे, तलावातील ३५०० ट्रॅक्टर गाळ काढण्यात आला, तसेच लोकसहभागातून शेतरस्ताही तयार करण्यात आला. साधारण २७ हजार ५२७ घनमीटर काम या ठिकाणी झाले. या कामाचे शासकीय मूल्य पाहता खर्च काही लाखांत झाला आहे; परंतु काम मात्र कोटी रुपयांच्या घरात आणि जलसाठाही कोटी लिटर्सचा झाला आहे. ही पाण्याची वारी, चळवळ कोणा एका व्यक्ती अथवा संस्थेवर अवलंबून न राहता प्रवाही होईल. ही चळवळ लोकांनी लोकांसाठी उभी केली आहे. ती अशीच अविरत चालू राहील... ग

## जीवनभराचा ठेवा

*स्वतःची ओळख निर्माण करणे, शक्यता काय आहेत हे इतरांना समजावून सांगणे, प्राधान्यक्रम ठरविणे, अशा गोष्टी डॉ. चव्हाण यांनी शिकविल्या. त्यांनीच प्रत्येक कार्यकर्त्यावर पाच-पाच गावांची जबाबदारी सोपविली. प्रत्येक गाव पाणीदार आणि समृद्ध करण्यासाठी व्यक्तिमत्त्व, नेतृत्वगुण विकसन आणि पाणी याविषयी लोकांशी संपर्क, संवाद आणि जमिनीवरील काम याचा ताळमेळ लोकसहभागातून कसा घालता येईल, याचे धडे त्यांनी सर्वांना दिले. जीवनात येणाऱ्या कोणत्याही समस्येवर तोडगा कसा काढावा यासाठीही या प्रशिक्षणाचा उपयोग होत आहे. या कामात वेळोवेळी गुरुवर्य मीनाक्षीताई यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे आत्मविश्वास उंचावला, तसेच भारती चौधरी, All E3 यन ग्रुप, चाळीसगावमधील सर्व सामाजिक संस्था, रोटरी क्लब आणि सर्व पत्रकार बंधू यांचे सहकार्य लाभले.*



गावागावात जाऊन पाण्याविषयी तसेच नाला खोलीकरण काळाची गरज, 'पाणी आडवा –पाणी जिरवा', 'झाडे लावा–झाडे जगवा' हा संदेश देत जनजागृती व मार्गदर्शन करताना

# पत्रकार ते जलयोध्दा

**अभियान कोणतेही असो, त्यात समाजातल्या प्रत्येक घटकाचा सहभाग असायला हवा. जितके जास्त घटक त्या अभियानात समाविष्ट होतात, तितकी त्या अभियानाची परिणामकारकता अधिक वाढते. डॉ. उज्ज्वल चव्हाण यांनी सुरू केलेल्या चाळीसगावच्या जलक्रांतीत असेच विविध क्षेत्रांतील बिनीचे शिलेदार सहभागी झाले आणि हे अभियान न भूतो न भविष्यती असे यशस्वी झाले. चाळीसगावचे दैनिक 'लोकमत'चे पत्रकार पंकज पवार हे त्या शिलेदारांपैकी एक.**

पंकज पवार हे 'लोकमत'चे धामणगावचे पत्रकार आणि छायाचित्रकार. त्यांच्या कुटुंबाला सामाजिक कार्याचा मोठा वारसा. त्यांचे आई–वडील आणि संपूर्ण कुटुंबच सामाजिक कामांची वाट पाहात असते. त्यांच्या वडिलांनी धामणगावचे सरपंच म्हणून गावात मोठे काम उभे केले आहे. त्यामुळे आपणही वडिलांसारखे काम करावे, नाव कमवावे असे पंकज यांनाही वाटत होते. ते एखाद्या चांगल्या संधीची वाटच पाहात होते. तशी संधी डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी उपलब्ध करून दिली आणि पंकज पवार या जलक्रांतीचे अविभाज्य अंग बनले.

त्याचे झाले असे, धामणगावचा पाण्याचा प्रश्न पाहून डॉ. चव्हाण यांनी ऑक्टोबर २०१७ मध्ये ग्रामस्थांची व्यापक बैठक घेतली. भविष्यात तिसरे महायुद्ध झाले तर ते पाण्यासाठीच होईल, असे त्यांनी ऐकले होते. त्यातच पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी तसेच जनावरांसाठी लागणारे पाणी, त्याची असणारी टंचाई याची माहिती डॉ. चव्हाण यांनी त्या बैठकीत दिली. गावचे सरपंच, तलाठी, ग्रामसेवक, सर्व सदस्य या बैठकीला उपस्थित होते. गावचा पाणीप्रश्न सोडवायचाच असा निर्धार सर्वांनी एकदिलाने केला. हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रस्तावित उपक्रमांचे नियोजन युवक मंडळाकडे देण्यात आले.

त्यानंतर आणखी एक बैठक झाली. गावातील शेतांच्या क्षेत्रफळाचे चार भाग करण्यात आले. त्या प्रत्येक भागाची जबाबदारी स्वखुशीने घ्यावी, असे ठरविण्यात आले. पंकज यांनी दक्षिण–पूर्व भागाची जबाबदारी घेतली. गावासाठी काहीतरी करून दाखविण्याची पंकज यांच्यासाठी ही संधीच होती. त्यानंतर झालेल्या प्रत्येक बैठकीला तसेच चौकसभेला पंकज मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

पंकज यांच्या चिकाटीला कारणीभूत ठरले ते अंमलबजावणी संचालनालयाचे उपसंचालक डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण. गावचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी ते दर पंधरा दिवसांनी धामणगावला भेट देत असत. कार्यकर्ते गोळा करीत. त्यांची धावपळ पाहून पंकज खूप प्रभावित झाले. वडील बालाजी पवार यांनीही पंकज यांना प्रोत्साहन दिले. पंकज यांच्या गुरु शोभाबाई चव्हाण यांनीही पंकज यांना बळ दिले आणि पंकज पवार या चळवळीत दाखल झाले.

## नाला खोलीकरणाला सुरुवात

धामणगाव येथे फेब्रुवारी २०१८ मध्ये नाला खोलीकरणाला सुरुवात झाली. या उपक्रमाला सर्वांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मात्र, जलयुक्त शिवार योजनेतून गावाच्या चार भागांपैकी १३ लाख निधीतून फक्त एका भागाचे खोलीकरण पूर्ण करण्यात आले.



**सकाळ रिलीफ फंडातून नाला खोलीकरण शुभारंभप्रसंगी डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण, पंकज पवार व अन्य मान्यवर.**

गावातील उरलेले तीन भाग पूर्ण करता येणार नाहीत, असे सांगण्यात आले. त्यात पंकज यांनी जबाबदारी घेतलेला भागदेखील राहून गेला. वारंवार कृषी सहायक, कृषी अधिकारी यांच्या भेटी घेऊनही पंकज यांच्या पदरी निराशा आली. निधीच्या अनुपलब्धतेचे कारण त्यांना सांगण्यात आले.

उरलेल्या भागाच्या खोलीकरणासाठी अंदाजपत्रक बनवून द्यावे, तो भाग कामात समाविष्ट करावा अशी विनंती पंकज यांनी वारंवार अधिकाऱ्यांना केली. मात्र, अनेक अधिकाऱ्यांनी काही ना काही कारण सांगून वेळ मारून नेली. प्रतिसादाच्या अभावामुळे पंकज काहीसे नाराज झाले. मात्र, कामासाठी आवश्यक अंदाजपत्रक बनविणे हे तांत्रिक काम स्वतः करण्याचे ठरविले. माणूस अखेरपर्यंत काही ना काही शिकतच असतो, ही चव्हाण यांची शिकवण पंकज यांनी अंगी बानवली होती.

एप्रिल २०१८ मध्ये कडक उन्हाळा पडला. शेतावर, बांधावर पाण्याचा एक थेंबही नव्हता. तेव्हा पंकज आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अंदाजपत्रकासाठी मोजमाप घेतले. ३ दिवसांत गावाचे सगळे मोजमाप घेऊन पूर्ण झाले. ३५ छोट्या-मोठ्या बंधाऱ्यांचा समावेश असलेला तब्बल २० पानांचा सचित्र आराखडा पंकज यांनी तयार केला. मात्र, त्याकडेही अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. शेवटी चिडलेल्या पंकज आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उपोषणाचा इशारा दिला आणि अधिकारी पाहणीसाठी शिवारात दाखल झाले. मात्र, पाहणी करताना अनेक करणे सांगून आराखडा नामंजूर केला.

### अडचणींचे डोंगर

जलयुक्त शिवार योजनेंतर्गत ८० लाखांचा निधी गावासाठी आला होता. मात्र, त्यातून फक्त २५ टक्के शिवाराचेच काम झाले आणि ७५ टक्के शिवार तसेच राहिले. त्यामुळे जलयोद्ध्यांचा आत्मविश्वास हरवला. नकारात्मक भावना निर्माण झाली. तुमच्या शिवरापासून कामाला सुरुवात करू, असा शब्द जलयोद्ध्यांनी शेतकऱ्यांना दिला



**नाला खोलीकरणविषयी चर्चा करताना डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण.**

होता. त्यामुळे शेतकरी आशेवर होते. मात्र, अधिकारी सहकार्य करीत नव्हते. त्यामुळे लोकसहभाग मिळविण्यातदेखील अडचणी येत होत्या.

### अडचणींवर केली मात

जलयुक्त शिवार योजनेतून पूर्ण शिवाराचे काम झाले नव्हते. लोकांची जनजागृती तर झाली होती. त्यामुळे लोकांकडूनच कामाची मागणी होती. हे लक्षात घेऊन इतर कोणते पर्याय आहेत, याचा शोध घेण्यात आला. सुदैवाने गावाची तयारी पाहून सिद्धिविनायक ट्रस्ट आणि सकाळ रिलीफ फंड मदतीसाठी देवासारखे धावून आले.

## सामाजिक बांधिलकीचा वारसा!

*पंकज पवार यांची एक जलयोद्धा अशी ओळख तयार झाली आहे. त्यांचे वडील बालाजी केशवराव पवार हे गावातील प्रतिष्ठित व्यक्ती आहेत. वयाच्या २५ व्या वर्षी म्हणजे १९७८ साली त्यांची गावामध्ये बिनविरोध निवड झाली होती. तेव्हा ते उपसरपंच झाले. त्यानंतर १९८४ मध्ये निवडणूक जिंकून सरपंच झाले. १९७८ ते २०२० जवळजवळ बेचाळीस वर्षे समाजकारण व राजकारणातून गावाच्या विकासात त्यांनी योगदान दिले. या काळात त्यांनी स्वतःहून अनेकांना सरपंच घडविले. २०१० मध्ये जेव्हा पुन्हा बिनविरोध निवडणूक झाली, तेव्हा पुन्हा त्यांचेच नाव सर्वांत पुढे आले. मात्र, त्यांनी स्वतःहून ज्येष्ठ सदस्य म्हणून राहीन असे सांगितले. आजही धामणगावातील सर्व ग्रामस्थांमधून पुन्हा एकदा पवार बाबांचीच गरज आहे, असे बोलले जाते. पंकज यांचे आजोबा कै. माजी सरपंच केशवराव यादवराव पवार हे १९५३ मध्ये म्हणजेच ग्रामपंचायत स्थापनेपासून ते १९८४ या कालावधीमध्ये सरपंच व उपसरपंच राहिले. आजोबांची प्रेरणा आणि वडिलांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. मोठे भाऊ सुनील बालाजी पवार हेही गावाचे तंटामुक्त अध्यक्ष झाले. प्रथम त्यांनी गावामध्ये दारूबंदी केली व तंटे मिटविले. त्यांचे सर्व मोठे कुटुंब एकत्र असून, सगळ्यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. पंकज यांचे गुरू शोभाबाई भीमराव चव्हाण यांनी पहिली ते चौथीचे शिक्षण आई जिजाऊसारखे दिले. सामाजिक बांधिलकी व शौर्याचा शिवाजी महाराजांचा वैचारिक वारसा लाभला. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण साहेबांनी जलयोद्धा म्हणून घडविले. गावात नाला खोलीकरणाद्वारे जलसाठा उपलब्ध करून दिला. हे एक ऐतिहासिक काम झाले, त्यामध्ये मला योगदान देता आल्याची भावना पंकज यांनी व्यक्त केली.*

सिद्धिविनायक ट्रस्ट आणि सकाळ रिलीफ फंडातून मंजूर झालेल्या कामांसाठी नव्याने आराखडे तयार करण्यात आले. उन्हातान्हात मेहनत केली आणि नाला खोलीकरण करण्यात आले.

### व्यक्ती तितक्या प्रकृती

व्यक्ती तितक्या प्रकृती असे म्हणतात. सामाजिक काम करताना अशा प्रवृत्तीचा अनुभव येतोच. सुरुवातीला नाला खोलीकरणाला सुरुवात झाली नाही, तेव्हा शेतकऱ्यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली. नाला खोलीकरणासाठी जेव्हा पोकलेन मशीन दाखल झाले, तेव्हा काम आपल्या शेताकडूनच सुरू व्हावे, अशीच प्रत्येक शेतकऱ्याची इच्छा असायची. त्यातून वाद व्हायचे ते सोडवावे लागायचे.

पोकलेनच्या साहाय्याने जेव्हा कामाला सुरुवात झाली, तेव्हा त्या नाल्याच्या शेतकऱ्याने एक रुपयाचेदेखील सहकार्य केले नाही. २ महिन्यांनंतर दुसऱ्या कामासाठी जेव्हा नाला खोलीकरण करण्यासाठी मशीन आले, तेव्हा १ तासाला ३०० रुपयांचे डिझेल शेतकऱ्यांनी दिले. ज्या शेतकऱ्यांचे खोलीकरण पूर्ण झाले, त्यांना चांगले पाणी उपलब्ध झाले आणि चांगली पिके आली. त्यामुळे लोकांचा कामावरचा विश्वास वाढला. त्यातून सहभाग आणखी जास्त वाढला. पुढील वर्षी त्या शेतकऱ्यांनी तासाला १ हजार रुपयांचे डिझेल टाकून आपले काम पूर्ण केले.

### माथा ते पायथा नियमावली

धामणगाव येथे नाला खोलीकरण करताना अत्यंत शिस्तबद्ध पद्धती वापरण्यात आली. कामाची सुरुवात माथ्यावर म्हणजे उगमाच्या ठिकाणी करण्यात आली आणि समाप्ती पायथ्याला म्हणजेच नाल्याची हद्द जिथे संपते, त्या शिदवाडी रस्त्याकडे करण्यात आली. नाला खोलीकरणासाठी नियमावली तयार करण्यात आली. ज्या शेतकऱ्याने डिझेलसाठी पैसे, नंबर, तारीख दिली आहे, त्या शेतकऱ्यांना पूर्वसूचना देऊन तयारीत राहण्याचे आवाहन केले जायचे. कामात पारदर्शकता राहावी यासाठी हिशेब ठेवण्याकरिता तरुणाची नियुक्ती करण्यात आली. पोकलेन नियोजनाची जबाबदारी पंकज यांच्यावर होती. संबंधित शेतकरी, हिशेब ठेवणारा मुलगा स्वप्निल आणि पंकज असे तिघे दिवस-रात्र काम पाहायचे. या संपूर्ण कामात पारदर्शकता असायची. त्यामुळे शेतकऱ्यांनी कामाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### शेतकऱ्यांचे बोलके अनुभव

पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी डॉ. चव्हाण यांनी अथक प्रयत्न केले होते. त्यामुळे जलदूत अशीच त्यांची प्रतिमा निर्माण झाली होती. सकाळ रिलीफ फंडातून या कामांसाठी निधी प्राप्त झाला होता. एकदा 'सकाळ'ची टीम कामांची पाहणी करण्यासाठी आली होती. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या मुलाखती घेतल्या. 'माझे वय ७५ वर्षे आहे. गुराढोरांना पाणी पाजायला मला दुसऱ्याच्या बांधावर जावे लागायचे. आता माझ्याकडे भर मे महिन्यातदेखील पाणी आहे', असे उत्तर प्रताप जगताप या शेतकऱ्याने दिले होते. त्यावेळी त्याच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते. अनेक शेतकरी कामाकडे डोळे लावून बसलेले असायचे. ८० टक्के शेतकऱ्यांनी या कामाला चांगला प्रतिसाद दिला. या योजनेमुळे गावातील ५०० हेक्टर जमीन ओलिताखाली आली. कोट्यवधी लिटर पाणीसाठा झाला. २०२० मेच्या कडक उन्हाळ्यात शिवारात पाणी होते. नदी मार्च महिन्यापर्यंत वाहिली, असे पाणी गेल्या पिढीत कुणीच पाहिले नाही. कडक उन्हाळ्यात शेत हिरवेगार होते.

### लोकसहभाग काळाची गरज

कोणत्याही कार्यात लोकसहभाग असेल, तर ते कार्य यशस्वी होतेच. धामणगावदेखील त्याला अपवाद नव्हते. डॉ. चव्हाण यांनी या अभियानात विविध क्षेत्रांतील लोकांना सहभागी करून घेतले होते. सुरुवातीला शेतकऱ्यांनी लोकवर्गणी म्हणून डिझेलची १० टक्के रक्कम आकारण्यास सुरुवात केली. तेव्हा कामात असंख्य अडचणी आल्या. त्यानंतर ३० टक्के रक्कम आकारण्यास सुरुवात करण्यात आली, तेव्हा अडचणी काही प्रमाणात कमी झाल्या. मात्र, ५० टक्के रक्कम आकारण्यास सुरुवात झाल्यानंतर काम सुरळीत झाले. लोकसहभाग वाढला, तर कामाची गुणवत्ता वाढते आणि काम सोपे होते हे कळाले.



मे २०२० च्या कडक उन्हाळ्यात धामणगावातील नदीला असणारे निळेशार पाणी...

> पाणी ही भविष्यातील सर्वांत मोठी समस्या ठरणार आहे. ती टाळण्यासाठी अनेक उपक्रम राबविता येतील. पुढील पिढ्यांच्या कल्याणासाठी पाणी वाचविणे आवश्यक आहे. आपण मुलांना पैसाअडका देऊ शकतो, जमीनजुमला देऊ शकतो. मात्र, पाणी निर्माण करून देऊ शकणार नाही. त्यासाठी पाण्याचा बॅलन्स वाढवणे, पाणी अडविणे व ते जिरविणे आवश्यक आहे. सर्वांनी त्यासाठी काम केले पाहिजे.

### लोकसहभागातून अन्य उपक्रम

धामणगावात लोकसहभागातून सैनिकांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न झाला. गावात त्या दिवशी दिवाळीसारखे वातावरण होते. रोजगारानिमित्त गावाबाहेर असलेले हजारो लोक त्या दिवशी गावात दाखल झाले होते. ज्या सैनिकांचा सत्कार झाला, त्यांनी सैनिकांचा एक ग्रुप तयार केला. त्यातील प्रत्येकाने तीन हजार रुपये वर्गणी काढून गावातील मुलांसाठी धावण्याचा ट्रॅक तयार करीत आहेत.

### लोकसहभागातून वाचनालय

धामणगावचे वाचनालय अनेक दिवसांपासून बंद होते. एका छोटेखानी बैठकीत या वाचनालयाचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. उज्ज्वल चव्हाण यांनी वाचनालयासाठी टेबल-खुर्ची दिली. एका तरुणाने दोन कपाटे दिली. काहीजणांनी १ वर्षाचे पेपर तसेच पुस्तकांची मदत केली. आता वाचनालयात एमपीएससी, यूपीएससीसंदर्भातील पुस्तके उपलब्ध आहेत. या वाचनालयाची जबाबदारीही पंकज यांनीच घेतली आहे.

### लोकसहभागातून शिवजयंती

पाणी चळवळ, वाचनालय, सैनिकांचा सत्कार आदी उपक्रम घेतल्यामुळे तसेच व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात सहभाग घेतल्यामुळे पंकज यांच्यातील नेतृत्वगुण विकसित झाले होते. दरवर्षी ढोल-ताशांच्या गजरात होणारी शिवजयंती लोकसहभागातून साजरी करायची असे पंकज यांच्या मनाने घेतले. कोणीही आयोजक, प्रायोजक घ्यायचा नाही आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने जयंती साजरी करायची, असे त्यांच्या मनाने घेतले. त्यानुसार शिवजयंतीला महाराजांच्या आयुष्यावर दोन शब्द बोलण्याची संधी शाळकरी मुलांना देण्यात आली. बाहेरून वक्ते न आणता आपलेच वक्ते तयार व्हावेत, हा त्यामागे उद्देश होता. गावातल्या ६२ मुलांनी त्यात सहभाग घेतला. संध्याकाळी ६ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम रात्री ११ वाजेपर्यंत सुरू होता. सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य बक्षिसादाखल देण्यात आले आणि वेगळ्या पद्धतीने शिवजयंती साजरी करण्यात आली.

### मिशन ५०० कोटी लिटर्स

डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या संकल्पनेतून आलेल्या 'मिशन ५०० कोटी लिटर्स' अभियानात पंकज पवार यांनी भरीव योगदान दिले. व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात घडलेल्या या कार्यकर्त्याने सिंहाचा वाटा उचलताना पाच गावांची जबाबदारी घेतली. धामणगाव, पळासरे, खडकीसीम, लोंढे, दहिवद अशा गावांची जबाबदारी घेऊन तिथे जागृती केली. शेतकऱ्यांना मार्गदर्शनही केले.

### जलयोद्धा म्हणून ओळख

पंकज पवार पाणीप्रश्नासंदर्भात खूपच गंभीर आहेत. गावागावांत जनजागृती, शिवाय चाळीसगाव तालुक्यात शोषखड्डे, सीसीटी, पाणी बचत, 'पाणी आडवा, पाणी जिरवा'ची जागृती केली आहे. त्यामुळे दैनिक 'सकाळ'च्या वर्धापनदिनी चाळीसगाव येथे, रोटरी क्लबतर्फे दोंडाईचा येथे व अन्य ठिकाणी त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला आहे. मुलांनी त्यांच्या कामावर प्रकल्प, निबंध तयार केले आहेत.

### व्यक्तिमत्त्वात घडलेले बदल

'मिशन ५०० कोटी लिटर्स' आणि पाणी चळवळीमुळे पंकज पवार यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रचंड बदल झाला. तीन वर्षांपूर्वी ते वृत्तपत्राचे प्रतिनिधी आणि एक सामान्य फोटोग्राफर होते. त्यांचे दैनंदिन आयुष्य इतरांसारखे होते. या अभियानातून प्रभातफेऱ्या, घोषणाफलक, पथनाट्ये, शाळांवर मार्गदर्शन, प्रत्यक्ष केलेले काम यामुळे व्यक्तिमत्त्व समृद्ध झाले. एक एक गावाची जबाबदारी घेताना संपूर्ण तालुक्यात त्यांचे नाव झाले. एक जबाबदार व्यक्ती म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. मित्रपरिवार आणि वर्तुळ वाढले आहे. आणि या बदलाचे संपूर्ण श्रेय ते डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांना देतात.

'मिशन ५०० कोटी लिटर्स'अंतर्गत गावागावांत जलयोद्धे तयार झाले आहेत. त्यांच्यावरची जबाबदारी वाढवून आपले स्थान त्यांना द्यायचे आणि नवे नेतृत्व घडवून ही चळवळ निरंतर सुरू ठेवायची, असा विचार पंकज यांनी केला आहे. गिरणा नदीच्या पाण्याचा संपूर्ण खोऱ्यात सदुपयोग होण्यासाठी योगदान देण्याचा त्यांचा मानस आहे.... ग



# ध्येयवेड्याच्या चळवळीने ब्राम्हणशेवगे झाले पाणीदार

**आव्हान कितीही खडतर असो, ते कुणीतरी पेलण्याची सुरुवात करायला हवी. ही सुरुवात करणारा सर्वांत महत्त्वाचा असतो. चळवळ नि:स्वार्थ असेल आणि त्यात लोकहित असेल तर त्यात लोक सहभागी होतात आणि तिला यश निश्चित मिळते. सुरुवातीला अशक्यप्राय वाटणारे आव्हान सोपे होऊन जाते. असेच एक अशक्यप्राय वाटणारे आव्हान पेलले एका सामाजिक कार्यकर्त्याने. अनेक वर्षे दुष्काळाचा सामना करणाऱ्या ब्राम्हणशेवगे गावाला या लढवय्याने पाणीदार करून दाखविले. त्यासाठी नोकरीही सोडली. लोकांना एकत्र केले आणि अशक्य ते शक्य करून दाखवले. सोमनाथ माळी असे त्या लढवय्याचे नाव.**

ब्राम्हणशेवगे हे तीन हजारांच्या आसपास वस्ती असलेले आणि संपूर्ण शेतीव्यवसायावर अवलंबून असलेले गाव. गावात सर्व जातिधर्माचे लोक गुण्यागोविंदाने राहतात. गावात एकूण १ हजार २०० हेक्टर शेतजमीन. पूर्वेला नाईकनगर, सरकारी बर्डी तसेच रम्हणे म्हणून ओळखली जाणारी वस्ती, दक्षिणेला १९७२च्या दुष्काळात बांधलेला धामणी नदीवरील पाझर तलाव. या तलावावरच गावचा पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न अवलंबून आहे.

३० ते ३५ वर्षांपूर्वी गाव परिसरातील नदी, नाले, ओढे, तसेच पाझर तलाव असलेली धामणी नदी आणि गावालगत उत्तरेकडून गेलेला मन्याड धरणाचा पाट हे सर्व वर्षभर खळखळून वाहत होते. मात्र, दिवसेंदिवस पावसाचे प्रमाण कमी कमी होत गेले. संपूर्ण गाव परिसरात १५-२० शेतकरी मोट किंवा डिझेल मशीनद्वारे पाणी उपसा करीत होते. त्यामुळे या विहिरींच्या पाण्याची पातळी फक्त १५-२० फुटांपर्यंत होती; परंतु पावसाचे प्रमाण सातत्याने कमी होत गेले. विहिरींची संख्या ४०० पर्यंत वाढली. सोबत बेसुमार उपसा त्यामुळे पाणीपातळी घटत गेली. वीजपंपांची संख्या वाढत असल्यामुळे ७०-८० फूट खोल खणूनसुद्धा विहिरींना पाणी मिळेनासे झाले. दोन-दोनशे फूट खोल खणलेल्या कूपनलिकासुद्धा कोरड्याठाक पडू लागल्या. त्यामुळे हा परिसर डार्क झोनमध्ये समाविष्ट झाला.

खळखळून वाहणारे नदी-नाले आटले. कूपनलिका कोरड्या पडल्या. विहिरींनी तळ गाठला. साहजिकच शेतीचे उत्पन्न कमी झाले. रोजगार घटला. साहजिकच शिकले सवरलेले तरुण पोटापाण्यासाठी शहरांकडे स्थलांतर करू लागले. बहुसंख्येने असलेला बंजारा समाज ऊसतोडीसाठी कारखान्यांकडे जाऊ लागला. स्थलांतराचे प्रमाण प्रचंड वाढले. शेती, गुरे-ढोरेच नाही तर माणसांनाही पाण्यासाठी दाहीदिशा भटकावे लागले. दुष्काळाची भीषण स्थिती दरवर्षी आणखी दाहक होऊ लागली. दुष्काळाच्या झळा एवढ्या वाढल्या की, चार वर्षांपूर्वी ग्रामपंचायतीला तब्बल ९ किलोमीटरवरून मन्याड धरणाचे पाणी पिण्यासाठी तात्पुरत्या पाणीपुरवठा योजनेद्वारे आणण्याची नामुष्की ओढवली. अतिशय घाण, दुर्गंधीयुक्त पाणी पिण्याची वेळ ग्रामस्थांवर आली. सलग चार वर्षे दुष्काळाने घिरट्या घातल्यामुळे





नंतरच्या काळात १७-१८ किलोमीटर चाळीसगाव येथून दररोज ४ ते ५ टँकर जुलै अखेरपर्यंत आणण्याची नामुष्की गावावर ओढविली.

या भीषण स्थितीचा सामना कसा करावा, याचाच विचार प्रत्येकजण करीत होता. अशातच ब्राम्हणशेवगे येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ माळी यांनी पुढाकार घेतला. कला शाखेची पदवी घेतलेले सोमनाथ माळी हे मालेगाव नगरपालिकेत चांगल्या पगाराच्या नोकरीवर काम करीत होते. आपल्या गावची दुष्काळी परिस्थिती सुधारावी, गावात निसर्गसंपदा असावी, गाव पर्यावरणयुक्त असावे, पाणीपुरवठा पूर्वीप्रमाणे असावा, असा निर्धार त्यांनी केला. दरवर्षी पडणारा पाऊस सरासरीपेक्षा कमी असला तरी पडलेल्या पावसाचे पाणी अडवून ठेवण्यासाठीचे भांडे म्हणजे सिमेंटचे बंधारे, मातीत बांध पूर्णपणे गाळाने भरलेले आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी लगेच वाहून जाते. त्यामुळे पावसाचे पाणी आपल्या शिवारात जिरवावे, यासाठी माळी यांनी नोकरीचा राजीनामा देऊन जलचळवळ सुरू केली.

ब्राम्हणशेवगे गावात व शेवरी शिवारात १९९७-९८ मध्ये पाणलोटअंतर्गत बांधलेले १५-१६ सिमेंटचे बंधारे आणि १९७२च्या दुष्काळापूर्वी ४०-४५ मातीनाले बांध बांधलेले होते. यामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ आणि माती साचली होती. त्यामुळे पावसाचे पडलेले पाणी वाहून जात होते. जलचळवळीत वाहून जाणाऱ्या पाण्यावर काम करण्याचे निश्चित करण्यात आले. जलयुक्त शिवार योजनेत गावाचा समावेश करण्यापासून जुलै महिन्यापर्यंत संघर्ष तर कधी आंदोलनाचा पवित्रा घेत १२ सिमेंट बांध खोलीकरण व रुंदीकरण करून घेण्यात आले. शासन धोरणानुसार या कामासाठी ३४ लाख रुपये खर्च झाल्याचे सांगण्यात आले. या कामात शेवरी शिवारातील ५ माती बांध नाल्यांचा समावेश आहे.

जलयुक्त शिवार योजनेतून १७ नाले, तर मनरेगामधून ३ नाल्यांचे खोलीकरण करण्यात आले. आदल्याच वर्षी गावाने पानि फाउंडेशनच्या स्पर्धेत भाग घेतला होता. लोकसहभागातून शोषखड्डे खोदण्यात आले होते. शेवरी शिवारात सहा मातीबांध नाल्यांचे खोलीकरण व रुंदीकरण तसेच पाझर तलावाखालील नदीचा गाळ काढण्याचे तसेच नदी खोलीकरणाचे काम पाच ठिकाणी करण्यात आले. या कामासाठी जलयुक्त शिवार योजनेंतर्गत अर्थसहाय्य

## पाठबळ व सहकार्य

*या चळवळीला सरपंच सौ. आशा माळी, ग्रामपंचायत सदस्य, गावाचे भूमिपुत्र जे बाहेरगावी राहूनही गावाचे आपण देणे लागतो, या भावनेने आर्थिक व वस्तूरूपात मदत करणारे मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी सुनील राठोड, न्यायाधीश चिंतामण शेळके, लक्ष्मण शेळके, डॉ. निलेश राठोड, धिरसिंग राठोड, सुधीर राठोड, तसेच प्रत्यक्ष कामात मदत करण्यासाठी धडपड करणारे, विकासो चेअरमन विष्णू राठोड, पोलीसपाटील राजेंद्र माळी, मा. सरपंच ज्ञानेश्वर राठोड, तंटामुक्त समिती अध्यक्ष मदन राठोड, ग्रा. सदस्य वासुदेव जाधव, रवींद्र राठोड, सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर पवार, तसेच आपले शिवार पाणीदार व्हावे, अशा भावनेने प्रयत्न करणारे शेतकरी बद्रिनाथ राठोड, स्टॅम्प व्हेंडर रमेश निकम, उखाबाबा राठोड, जगराम राठोड, किशोर राठोड, नागू राठोड, कांतिलाल चव्हाण, मोरसिंग चव्हाण, चुडामण चव्हाण, बळिराम चव्हाण, बापू पाटील, मनोज राठोड, जुगराज राठोड, राजकुमार चव्हाण आदी शेतकरीबांधवांनी या चळवळीला आर्थिक बळ दिले, तसेच बापजी हॉस्पिटलचे डॉक्टर, रोटरी क्लबचे तालुका अध्यक्ष देशमुख यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले. त्यामुळे एवढे मोठे काम उभे राहू शकले.*

लाभले. गावालगत असलेल्या धामणी नदीवरील धरणाचे पाटाचे गेट सोमनाथ माळी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करून कायमस्वरूपी बंद करण्यात आले. पाटाला पाणी सोडल्याने फायदा कमी आणि नुकसान जास्त अशी स्थिती होती. हे ओळखून गेट बंद करण्यात आले. त्यामुळे धरणाचे पाणी मोठ्या प्रमाणात वाया जाणे बंद झाले. त्याचा परिणाम म्हणजे पहिल्याच वर्षी शंभरहून अधिक शेतकरीबांधवांनी या पाण्यावर आपली जमीन सुजलाम् सुफलाम् केली.

मागील वर्षी वरुणराजाने चांगली कृपा दाखविली. सरासरीपेक्षा









अधिक पाऊस पडला. जलयुक्त शिवार, मनरेगा, पानि फाउंडेशन यांच्या माध्यमातून झालेल्या नाला रुंदीकरण आणि खोलीकरण तसेच पाणलोट विकासाच्या कामांमुळे जवळजवळ ३० ते ३५ वर्षांच्या एप्रिलपर्यंत परिसरातील नदी-नाले खळखळून वाहत होते. धामणी नदीपात्रातही आजपर्यंत पाणी वाहत आहे. हे सर्व जलचळवळीचे फलित आहे.

'मिशन ५०० कोटी लिटर जलसाठा' उपक्रमात गावांचा समावेश व्हावा, यासाठी जनजागृती करण्यात आली. मिशनचे सवसर्वा डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी काम तांत्रिकदृष्ट्या उत्कृष्ट व्हावे, यासाठी 'पाच-पाटील' टीम व गावप्रमुख प्रशिक्षण दिले. दर पंधरा दिवसांतून मुंबई येथून न चुकता येऊन प्रशिक्षण पूर्ण केले. तालुक्यातील जवळपास ६२ गावांमधून कामाचे नियोजन पूर्ण झाले होते. कामांचा शुभारंभ १५ मार्चला पातोंडा या गावापासून थाटात झाला. आता आपणही आपल्या गावात जोमात काम करू, अशी मनाशी गाठ बांधून सोमनाथ माळी व शेतकरीबांधवांनी नियोजन सुरू केले; पण एक मोठे संकट आ वासून उभे ठाकले. संपूर्ण जगात कोरानाचा प्रादुर्भाव वाढत होता आणि भारतातही २२ मार्चपासून लॉकडाऊन जाहीर झाले. दैनंदिन व्यवहार, कामे पूर्णपणे बंद झाली. आता गावातील खोलीकरण व रुंदीकरणाची कामे कशी करणार? असा प्रश्न निर्माण झाला. शेवरी शिवारातील ३० ते ३५ मातीनाला बांध खोलीकरण व रुंदीकरणाचे नियोजन झाले होते.

तालुक्यात इतर कोठे काम सुरू आहे का? याचा तपास करून पाहिला; पण कुठेच अशा पद्धतीची कामे केली जात नव्हती. या परिस्थितीत पोकलेन मशीनचे चालकही आपल्या गावाकडे गेले. त्यामुळे मशीन जागेवरच उभी राहिली. जवळपास महिना उलटला तरी काहीही करता येईना, याची खंत सतावत होती. त्यानंतर मात्र लॉकडाऊनचे नियम पाळत शेतकरीबांधवांच्या शेतालगत आपण काम करू शकतो. यासाठी डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्याशी चर्चा केली. पोकलेन मशीन मिळाले तर आम्ही काम करू शकतो, याची खात्री दिली. औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर येथील पोकलेन मशीनचे मालक प्रदीप गोर्डे यांनी तयारी दर्शविली; पण कोरोनाच्या पार्श्वभूमीवर काम कसे करायचे? हा प्रश्न उभा राहिला. त्यातून मार्ग काढत, नियमांचे पालन करत मशिन १७ एप्रिल २०२० रोजी रोटरी क्लबच्या माध्यमातून गावात आले. एकापाठोपाठ एक तब्बल तीस मातीनाले बांध, दोन सिमेंट बांध, दीड कि.मी. शिवरस्ता अशी कामे होत गेली.

डॉ. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानासाठी रोटरी क्लबतर्फे ३१० तास काम झाले, तसेच गुणवंत भाऊ सोनवणे या संगणक अभियंत्याने सामाजिक बांधिलकीतून जलसंधारणाचे उपक्रम हाती घेतले होते. अभोणे तांडा या गावात वाटरकप स्पर्धेत खूप चांगले काम करून गावाला तालुक्यात पहिला नंबर मिळवून दिला होता. त्यांना संपर्क केला असता त्यांच्या सेवा सहयोग संस्थेकडून पोकलेन मशीनद्वारे २०५ तास काम करण्यात आले. दोन्ही संस्थांच्या मदतीने ५६ दिवस काम चालले. लोकसहभागातून झालेल्या या कामासाठी शेतकरीबांधवांनी प्रतितास एक हजार रुपयांप्रमाणे डिझेल खर्च दिला.

सहा लाख पंचवीस हजार रुपयांत शासनाचे करोडो रुपये वाचवत एक लाख चाळीस हजार घनमीटर इतके काम झाले. एका पावसात जवळपास चौदा कोटी लिटर जलसाठा निर्माण होईल, एवढे प्रचंड मोठे काम न भूतो ना भविष्यती असे उभे राहिले. वरुणराजानेही कृपादृष्टी दाखविली व जूनच्या पहिल्याच आठवड्यात ही संपूर्ण मातिबांध ओव्हरफ्लो झाली. शिवारात कधी नाही एवढा पाणीसाठा झाला. या उच्चांकी कामामुळे शिवारात पडणाऱ्या पावसाचा थेंब न् थेंब अडवून भूगर्भात जिरविला गेल्यामुळे खालावलेली पाणीपातळी कमालीची वाढली. विहिरी तुडुंब भरल्या. नदी, नाले पूर्वीप्रमाणे वाहते झाले. या कामामुळे गावशिवार सध्यातरी पाणीदार झाले आहे. भविष्यात वरुणराजाने अशीच कृपादृष्टी दाखविली तर गावशिवार सुजलाम् सुफलाम् होईल, यात तिळमात्र शंका नाही. या संपूर्ण कामासाठी शेतकरीबांधवांची मेहनत, मिशन पाचशे कोटी लिटर जलसाठा 'पाच-पाटील' टीम, गावप्रमुख, शिवनेरी फाउंडेशन, भूजल अभियान तांत्रिक टीमचे मार्गदर्शन यामुळे काम अतिशय शास्त्रोक्त पद्धतीने झाले आहे... ग



# नवी दृष्टी, नवा संकल्प

**डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी सुरू केलेल्या अभियानात विविध क्षेत्रांतील लोकांनी योगदान दिले. त्यात तरुणांचा सहभाग लक्षणीय होता. शिक्षक, पत्रकार, महिला अशा क्षेत्रांतील लोकांचा सहभाग होताच. शिवाय वैद्यकीय प्रतिनिधी असलेले तरुणदेखील हिरिरीने मोहिमेत सहभागी झाले. हेमंत मालपुरे यांनीही झपाटून काम केले. 'मिशन ५०० कोटी लिटर्स'मध्ये हेमंत यांच्या सहभागाची ही गोष्ट.**

हेमंत हे चाळीसगाव तालुक्यातील वाघळी गावचे. त्यांनी औषधनिर्माणशास्त्राचे शिक्षण घेतले आणि धुळ्यातील एका फार्मा कंपनीत वैद्यकीय प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. गायन, भजन, कीर्तन, वृक्षारोपण यांची आवड त्यांनी जोपासली आहे. त्यांना सामाजिक कामे आणि पर्यावरणाचीसुद्धा विशेष आवड आहे. घरची परिस्थिती तशी बेताचीच. मात्र, गावाचा विकास व्हावा, अशी आंतरिक ऊर्मी त्यांच्यात होती. कर्ज काढून घेतलेले शिक्षण, त्या कर्जाची परतफेड, घर बांधण्यासाठी केलेली आर्थिक मदत, त्यानंतर घेतलेल्या दुकान गाळ्यासाठी केलेली तरतूद आणि कौटुंबिक पातळीवरील जबाबदाऱ्या ते सांभाळत आहेत.

हे सर्व करीत असतानाच आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होऊ लागली. सुदैवाने हेमंत यांना त्यांच्यासारखे समविचारी मित्र मिळाले. आयकर विभागातील अधिकारी शरद सोनावणे यांनी हेमंत यांच्या मनात सामाजिक काम करण्याची ज्योत पेटविली आणि त्यांचा पुढचा प्रवास सुरू झाला.

८ ऑक्टोबर २०१६ रोजी सर्वोदय फाउंडेशन, वाघळी या नावाने एक संस्था स्थापन झाली. स्वच्छता मोहिमेद्वारे या संस्थेने सामाजिक कामाची सुरुवात केली. दर रविवारी गावातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्याचा उपक्रम या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी हाती घेतला. हळूहळू अनेक कल्पना कार्यकर्त्यांच्या मनात येऊ लागल्या. गावात पाणपोई बसविण्यात आली. 'पर्यावरण दिन' साजरा करण्यात येऊ लागला. लोकसहभागातून पहिल्या वर्षी ५० झाडे लावण्यात आली. 'शिक्षकदिनी' गावातील सर्व आजी –माजी शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

'रविवार म्हणजे गावाची सेवा', असे जणू समीकरणच होऊन गेले. हेमंत यांना मित्रांची मदत मिळत गेली. वृक्षसंवर्धन वेगाने होत गेले. २०१८ मध्ये वृक्षांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्याच दिवशी नवीन वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यावेळी तालुक्यातील प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

हेमंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या कामाचा विस्तार हळूहळू वाढविला. बालदिनानिमित्त 'चित्र रंगवा' स्पर्धा आयोजित केली. त्या माध्यमातून मुलांनी गावच्या विकासासंदर्भात आपल्या





संकल्पना मांडल्या. त्या उपक्रमाने हेमंत यांचा हुरूप चांगलाच वाढला. मित्रांच्या सोबतीने ते विविध कामांत सहभाग घेत गेले. काय-काय करावे याच्या कल्पना हेमंत यांच्या डोक्यात घुमू लागल्या. २०१८ मध्ये त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या सोबतीने भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन केले. त्या शिबिरात ७५० रुग्णांचे रोगनिदान करण्यात आले. १२ रुग्णांवर डोळ्यांची शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली.

गावातील निवृत्त सैनिकांचा सत्कार सोहळा आणि सैनिक भरतीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन त्यांनी केले, तसेच आपल्या गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी काय करता येईल, हा प्रश्न त्यांना सतावू लागला. त्यासंदर्भात ते अनेक लोकांकडून मार्गदर्शन घेत गेले आणि त्याच सुमारास पानि फाउंडेशनने चाळीसगाव तालुक्याची वॉटरकप स्पर्धेसाठी निवड केली. हेमंत यांच्यासाठी हा आशेचा किरण होता. २०१९च्या फेब्रुवारी महिन्यात पहिल्याच ट्रेनिंग बॅचमध्ये गावातील दोन पुरुष आणि ४ महिलांनी प्रशिक्षण घेतले.

प्रशिक्षण घेतल्यानंतर सर्वांनी मोठ्या जोमाने कामाला सुरुवात केली. गावाला दुष्काळमुक्त करूच असा चंगच सर्वांनी बांधला. गावात गेल्यावर दुसऱ्याच दिवशी सर्व प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधींसमवेत ग्रामसभा घेण्यात आली आणि सर्वांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या. हेमंत व्यक्तिशः ठिकठिकाणी कॉर्नर सभा घेत होते. त्यामध्ये शोषखड्डे, खोलीकरण, सीसीटी, विहीर पुनर्भरण, पाण्याचा गैरवापर टाळणे आदीसंदर्भात मार्गदर्शन करीत होते; पण गावातून म्हणावा तसा प्रतिसाद नव्हता. अगदी प्रशिक्षणार्थीदेखील सोबत येत नव्हते आणि यातूनच हेमंत यांचा निर्धार पक्का झाला. आता थांबायचे नाही, काहीतरी करून दाखवायचे, हे त्यांच्या मनाने निश्चित केले.

८ एप्रिल २०१९ रोजी स्पर्धा सुरू झाली. श्रमदान सुरू झाले. पहिल्या दिवशी केवळ ७ लोक श्रमदानाला उपस्थित होते. हळूहळू

## जीवनभराचा ठेवा

*वाघळी परिसरात गटबांधणीला सुरुवात होत गेली आणि एक चळवळ उभी राहिली. त्याचे पूर्ण श्रेय हे डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांना जाते. त्यांनी पाणी चळवळीमध्ये काम करण्याची आवड असणाऱ्या लोकांना एकत्र केले आणि महिन्यातून दोनदा सर्वांच्या सोयीनुसार नेतृत्वगुणांचे धडे दिले. ग्रामविकास, संभाषणकौशल्य, माणसे जोडण्याची कला व सामाजिक संस्थांशी कसे जोडले जावे, याचा वस्तुपाठ घालून दिला. या सर्व कार्यकर्त्यांना एक नवी दृष्टी दिली. ती दृष्टी होती चाळीसगाव तालुक्यात 'मिशन ५०० कोटी लिटर्स'. अर्थात प्रत्येक गावात १० कोटी लिटर पाणीसाठ्याची.*

गावकरी त्यांच्या कामाने प्रेरित झाले आणि श्रमदान करणाऱ्यांची संख्या वाढू लागली. श्रमदानाबरोबरच इतर मशीनची कामे सुरू झाली. त्यासाठी लोकांनी सढळहस्ते मदत करण्यास सुरुवात केली. इंधनाचा खर्च गावकऱ्यांनी उचलला. हेमंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तसेच गावकऱ्यांनी लोकसहभागातून पावणेदोन लाख रुपयांचा निधी उभा केला. नियमित श्रमदानदेखील सुरू होतेच. श्रमदानातून ५० दिवसांत २ लाख २० हजार लिटर साठा होईल इतक्या क्षमतेचे काम पूर्ण केले आणि मशीनच्या साहाय्याने २ कोटी लिटर साठा होईल इतके काम पूर्ण केले. निसर्गानेदेखील गावकऱ्यांच्या या कामाला दाद दिली आणि पहिल्याच पावसात सर्व कामे पाण्याने तुडुंब भरली. सर्वांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

या कामामुळे परिसरातील शेतकऱ्यांचा खूप फायदा झाला. काहींच्या बोअरिंगला पुष्कळ पाणी येऊ लागले. त्यामुळे पुढील काम



जलसंधारणाबरोबरच वृक्षारोपणाचे अभियान राबविण्यात आले. या झाडांची जोपासनाही करण्यात आली. झाडांचा पहिला वाढदिवस साजरा करताना ह.भ.प. महामंडलेश्वर ज्ञानेश्वर माउली बेलदारवाडीकर तहसीलदार कैलास देवरे, ग्रामस्थ व सर्वोदय मित्रमंडळाचे सदस्य.

'नगरेची रचावी
जलाशये निर्मावी
महावने लावावी
नानाविध'
संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतील चौदाव्या अध्यायात वरील ओवींमध्ये ग्रामविकासाचे मर्म सांगितले आहे. त्याचेच तंतोतंत पालन मी आणि माझे सर्व सहकारी करीत आहोत. हे काम असेच पुढे नेण्याचा आमचा संकल्प आहे.



ऋषिपंचमीनिमित्त महिलांच्या हस्ते पन्नास वडाच्या झाडांची लागवड करण्यात आली.

करण्यासाठी सर्वांना प्रेरणा मिळाली. तालुक्यात सर्वत्र वाघळी गावाचे नाव आदराने घेतले जाऊ लागले. मोजक्याच तरुणांनी गावाला दुष्काळातून बाहेर काढले म्हणून गावोगावी सेवाभावी संस्था हेमंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा गौरव करू लागल्या. आणि पाण्यासाठी निरंतर काम करायचे, जिवात जीव असेपर्यंत काम सुरू ठेवायचे, असा निर्धार सर्वांनी केला.

दरम्यान, डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी 'मिशन ५०० कोटी लिटर्स' अभियान हाती घेतले. हेमंत या उपक्रमात सहकारी आहेत. या चळवळीत एकत्र आलेल्या कार्यकर्त्यांनी गावागावांची जबाबदारी घेतली. प्रत्येक गावातून एक गावप्रमुख आणि पाच सदस्य अशी टीम करण्यात आली आणि या चळवळीला व्यापक स्वरूप प्राप्त करून देण्यात आले. या चळवळीचा एक भाग म्हणून लोकांच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. त्यात १० ते ५० लोक सहभागी होत गेले. या कार्यशाळांमध्ये विविध लोकांच्या ओळखी होत गेल्या. प्रत्येकाच्या मनात वेगवेगळ्या संकल्पना होत्या. त्या संकल्पनांची देवाण-घेवाण झाली.

५० गावांमध्ये होणाऱ्या जलसंधारणाच्या या कामाला विविध संस्था, लोकप्रतिनिधी, प्रशासन, जलतज्ज्ञ यांचे मार्गदर्शन व आर्थिक मदत मिळवून देण्याचे काम डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी समर्थपणे केले. या उपक्रमाला आमदार मंगेश चव्हाण यांच्या शिवनेरी फाउंडेशन या संस्थेने मोलाचा हात दिला.

या सर्वांचे काम तालुक्याचे आमदार मंगेश चव्हाण यांच्यापर्यंत पोहोचले. त्यांनीसुद्धा या कामामुळे प्रभावित होऊन मदत करण्याचे आश्वासन दिले. तालुक्याच्या काही गावांतील ग्रामस्थांना पाणी बचतीचे प्रशिक्षण दिले आणि स्पर्धा म्हणून प्रत्येक गावासमोर एक आव्हान उभे केले... ग




# जामद्याची जलगुढी!

**डॉ उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी सुरू केलेल्या 'मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा' या अभियानात समाजाच्या सर्वच स्तरातील घटकांनी सहभाग दिला. जामदा येथील शिक्षक एकनाथ माळतकर यांनीही यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. आपले गाव, परिसर जलयुक्त आणि जलसाक्षर व्हावा, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांना तितकीच समर्थ साथ मिळाली ती त्यांच्या पत्नी आरस्ता माळतकर यांची. जामद्याची जलगुढी आणि त्यांच्या 'जलवारी'चा हा प्रवास...**

एकनाथ माळतकर यांचा जन्म ग्रामीण भागात कोरडवाहू शेतकरी कुटुंबात झाला. शेती व ग्रामीण भागातील प्रश्न त्यांनी जवळून अनुभविले. शिक्षक झाल्यावर ग्रामीण भागातच नोकरी करताना कमी होणारे पावसाचे प्रमाण, लहरी निसर्ग, त्यातून निर्माण होणारे प्रश्न, ग्रामीण शेतकरी, त्यावर अवलंबून असणारे शेतमजूर, काम नसल्यावर कुटुबांचे होणारे स्थलांतर, त्यामुळे त्यांच्या मुलांचे अर्धवट शिक्षण, दारिद्र्य, शेतीमाला भाव न मिळणे, कर्जबाजारीपणा, व्यसनाधीनता असे दुष्टचक्र त्यांनी पाहिले. राळेगणसिद्धी, हिवरे बाजार या गावांनी या समस्यांतून बाहेर पडण्यासाठी जे प्रयत्न केले, प्रयोग केले व त्या गावात झालेले बदल, प्रगती यांचा त्यांनी अभ्यास केला.

त्या गावांतील बातम्यांची पेपरची कात्रणे, पाणी व शेतीवर व्याख्यान देणारे वृक्षमित्र अरुण निकम सर, पद्मश्री अण्णा हजारे, पोपटराव पवार, माधवराव चितळे, मोहन धारिया, राजेंद्रसिंह, सुरेश खानापूरकर (शिरपूर पॅटर्न), श्री. बोराडे, विजय केडिया, (Roof water Harvesting system) यांसारख्या जलतज्ज्ञांनी केलेले प्रयोग यांचा ते अभ्यास करीत. आपल्या गावात जलसंधारणाचे कोणते काम करता येईल, याचा विचार त्यांच्या मनात असे. त्यातूनच कृषी प्रदर्शनांना भेट देण्याचा छंदच जडला. जलसंधारणाचे मॉडेल प्रत्यक्ष पाहण्याचा अनुभव घेतला. आपल्या या अभ्यासाची ही प्रेरणा त्यांनी पत्नी आरस्ता यांनाही दिली.

साधारण १९९५-९६ पासून पावसाचे प्रमाण कमी होत गेले. अमर्याद उपसा झाल्याने पाणीपातळी अतिशय कमी झाली. पाण्याच्या कमतरतेमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. ही परिस्थिती लक्षात घेऊन एकनाथ माळतकर यांनी आपल्या गावात पाण्याच्या कामास २००१ साली सुरुवात केली. त्यांच्या विहिरीजवळून वाहणाऱ्या भराडी नाल्यावर कमी पाऊस पडल्यावर ऑक्टोबरमध्ये दोन व्यक्तींनी एक तास श्रमदान करून वनराई बंधारा बांधला. या बंधाऱ्यामुळे विहिरीतील पाण्याच्या पातळीत वाढ दिसून आली. दुसऱ्या वर्षी पुन्हा पावसाळा संपल्यावर अत्यंत कमी श्रमात वनराई बंधारा बांधला, त्यामुळे मोठा जलसाठा निर्माण झाला.

विहिरीची जलपातळी उंचावली. मात्र, काही शेतकऱ्यांनी रात्री तो बंधारा फोडून टाकला. संपूर्ण पाणी वाहून गेले. बंधारा फोडणाऱ्या शेतकऱ्यांचा शोध घेतला आणि त्यांच्याशी चर्चा केली. त्यांना पाण्याचा सिद्धांत समजून सांगितला. तेव्हा त्यांना केलेल्या कृत्यांचा पश्चाताप झाला. पुढील वर्षापासून नियमित






सध्या सुरू असलेल्या कामांमुळे तालुक्यातील जलसाठा वाढून पुढील दोन पिढ्यांचा पाणीप्रश्न सुटणार आहे. अशा दोन पिढ्या जलसाक्षर झाल्या, तर पुढे पाणीप्रश्न आणि दुष्काळाला हरावेच लागणार आहे. या कामात आपण खारीचा का होईना, वाटा उचलला याचा अभिमान आहे.

सामूहिक वर्गणीतून बंधारा बांधण्यास सुरुवात झाली. ती परंपरा अनेक वर्षे कायम राहिली. २००६–७ मध्ये राष्ट्रीय विद्यालयाचे एनएसएस शिबिर जामद्याला झाले. तेव्हाही विद्यार्थी व शिक्षकांच्या मदतीने १०–१२ फूट उंचीचा बंधारा बांधला. यामुळे विहिरींच्या पाणीपातळीत वाढ झाली.

२०१२ सालातला भीषण दुष्काळ आणि त्यामुळे निर्माण झालेल्या समस्या त्यांनी पाहिल्या. जनावरे, मजूर यांचे हाल त्यांनी अनुभवले. स्थलांतर बघितले. शेतकरी कर्जबाजारी झाले. सरकारचे पाण्यासाठीचे प्रयत्न कमी पडत होते. संवेदनशील मनाच्या लोकांनी यासाठी काहीतरी केले पाहिजे, असे वाटत होते. दरम्यान, पानि फाउंडेशनची वॉटर कप स्पर्धा सुरू झाली.

## आरस्ता यांचे मोलाचे योगदान

शाहू मराठा महिला मंडळ चाळीसगावच्या अध्यक्षा तसेच स्वतःचा छोटासा व्यवसाय सांभाळणाऱ्या आरस्ता माळतकर या संवेदनशील गृहिणी आहेत. आपले गाव पाणीदार झाले पाहिजे, या भावनेने पती एकनाथ यांच्यासोबत त्या अभियानात सहभागी झाल्या. २०१९ मध्ये वॉटर कप पानि फाउंडेशनच्या निमित्ताने 'तुफान आलंया' हा कार्यक्रम टीव्हीवर दाखविला जात होता. आरस्ता यांच्यासाठी तो प्रेरणास्रोत ठरला. आपणही जलसंधारणाच्या कामामध्ये सहभागी व्हावी, ही भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली. योगायोगाने चाळीसगाव तालुका वॉटर कप स्पर्धेत सहभागी झाला आणि त्यांची इच्छा पूर्ण झाली. आरस्ता यांनी जवखेडा येथे पानि फाउंडेशनचे प्रशिक्षण घेऊन कामाला सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी गावकऱ्यांचा एक 'व्हॉट्सॲप ग्रुप' तयार केला आणि त्यावर पाण्याविषयी जनजागृती केली. त्या ग्रुपचे ब्रीदवाक्य आरस्ता यांनीच ठेवले. 'चला सर्वजण मिळून श्रमदान करुया, गावाला पाणीदार बनवूया. चला साक्षीदार होऊया जलमंदिराचे.' असे ब्रीदवाक्य होते. या स्पर्धेच्या निमित्ताने तयार केलेल्या आराखड्यातील होणारे काम दररोज ॲपमध्ये भरावे लागायचे. ही जबाबदारी आरस्ता यांनी घेतली. रात्रभर जागे राहून सुरुवातीची २२ मार्कांची ६०० शेतकऱ्यांची माहिती २ दिवसांत त्यांनी भरली आणि त्यानंतर त्यांचे गाव स्पर्धेसाठी पात्र झाले. गुढीपाडव्याच्या दिवशी एकनाथ व आरस्ता या उभयतांनी 'जलगुढी' उभारून जलदिंडीद्वारे गुढीची गावातून सवाद्य मिरवणूक काढली. जलगुढीची गावातील राममंदिरात स्थापना करण्यात आली आणि पानि फाउंडेशनचे काम सर्वांनी मिळून चांगल्या प्रकारे करून आपले गाव जलयुक्त व जलसाक्षर करण्याचा संकल्प करण्यात आला. हा संकल्प यशस्वी करत निसर्गाद्वारे पाण्याचे आणि स्पर्धेचे बक्षीस जिंकूनच ही गुढी उतरविण्यात आली.





'तुफान आलंया' हा कार्यक्रम प्रेरणा देत होता. आपणही या दुष्काळ मुक्तीच्या उपक्रमात सहभागी व्हावे, आपल्या अनुभवाचा उपयोग व्हावा, अशी भावना वाढत होती. २०१९ मध्ये तालुक्याचा सहभाग वॉटर कप स्पर्धेत झाला आणि एकनाथ यांनी चाळीसगावला पानि फाउंडेशनच्या प्रदर्शनाला भेट दिली. तेथे त्यांनी जामदा गावाचा फार्म घेतला. सरपंच, ग्रामसेवक आणि गावातल्या लोकांचे मार्गदर्शन आणि सहकार्य घेतले. महाशिवरात्रीला जामदा येथे खजिना महादेव यात्रेवेळी उपस्थित सर्वांना पानि फाउंडेशनच्या माहिती दिली. जामदा विकास मंच, पानि फाउंडेशन अशा नावांनी व्हॉटस्अप ग्रुप सुरू करीत जनजागृती केली आणि जामदा गावात पाणी चळवळीला सुरुवात झाली. यामध्ये माळतकर दाम्पत्य-परिवार झोकून देऊन काम करू लागला. आरस्ता यांचे छोटेसे साडीचे दुकान आहे; पण ते सर्व बंद ठेवून, नुकसान सहन करून पती-पत्नी दोघांनी वॉटर कप स्पर्धेची मोहीम जोमाने सुरू केली.

या कामासाठी सुरुवातीला रोपवाटिका तयार करायची होती. माळतकर दाम्पत्य, शाळेतील ५-६ विद्यार्थी व काही सहकाऱ्यांनी मिळून बैलगाडीतून नाल्यातील गाळ आणला. एक हजार पिशव्या भरून त्यात बिया टाकून रोपवाटिका तयार केली. रोपवाटिकेची देखभाल विद्यार्थी व एकनाथ यांचे बंधू निवृत्ती यांनी केली. ७ एप्रिल रोजी रात्री १२ वाजता प्रत्यक्ष फिल्डवर कामाला सुरुवात करण्यात आली. पहिल्या रात्रीच ४ सीसीटी खोदून तयार झाल्या. हळूहळू प्रतिसाद वाढू लागला. पहिल्या आठवड्यातच 'स्नेहालया'तर्फे मशिन कामासाठी एक लाखाची मदत मिळाली आणि सर्व जलयोद्ध्यांचा उत्साह दुप्पट झाला. दररोज सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत श्रमदान होऊ लागले. रात्रीच्या वेळीही पंचवीस एक तरुणांनी ट्रॅक्टरच्या उजेडात ५० दिवस अखंड श्रमदान केले. पानि फाउंडेशन टीमच्या मार्गदर्शनाने प्रत्येक उपचार शास्त्रशुद्ध पद्धतीने माथा ते पायथा बनविण्यात आला.

## माळतकर परिवाराचे योगदान

*गावासाठी पाण्याचे काम मनापासून करायचे म्हणून आरस्ता आणि त्यांचे पती एकनाथ माळतकर रोज चाळीसगावाहून जामद्याला जात होते. त्यात त्यांना परिवाराची मोलाची साथदेखील मिळत होती. पानि फाउंडेशनची टीम किंवा मशीन ऑपरेटर यांचे जेवण, चहा, नाश्ता यांची सोय आरस्ता यांच्या घरी होऊ लागली. सर्व कुटुंब पाण्याच्या ध्येयाने पछाडलेले होते. आरस्ता यांचे लहान दीर निवृत्ती माळतर तर खंजिरी घेऊन गावात जनजागृती करण्यासाठी चौका - चौकात गाणी म्हणून लोकांना या पवित्र कामासाठी मदतीला येण्याचे आवाहन करीत असत. यातून एक फायदा झाला की गावातील तरुण मुले रोज रात्री न चुकता श्रमदानासाठी येऊ लागली. एकूणच माळतकर परिवाराने अतिशय मोलाचे योगदान दिले.*

गावातील सैनिकांनी मशीन कामासाठी आर्थिक मदत केली. सुट्टीवर आलेले सैनिक तसेच बाहेरगावी नोकरीला असलेले गावकरी श्रमदानाला येत असत. सैनिक बंधूंचे आभार मानण्यासाठी गावात राममंदिरात एक छोटासा कार्यक्रम आयोजित केला. ६ मे रोजी महाश्रमदान ठेवले. त्यामध्येही अनेक सैनिक, फॉरेस्ट ऑफिसर्स, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, विद्यमान खासदार उन्मेष पाटील यांच्या पत्नी संपदा ताई, महिला मंडळे, बचत गटाच्या महिला, गावातील तरुण, गावकरी आणि महिला सहभागी झाले होते.





या चळवळीने प्रेरित होऊन गावातील सैनिक, शिक्षक, इतर नोकरदार आणि प्रतिष्ठित व्यक्ती या सर्वांनी मिळून चार लाख रुपये देणगी गोळा करून दिली. यातून अडीच किलोमीटर नाला खोलीकरण, तीन एकर जमिनीवर सीसीटी, दोन एलबीएस, एक गॅबियन, माती बांध, विहिरी पुनर्भरण, शेतांवर बांधबंदिस्ती, नाला खोलीकरणावर दगडी पिचिंग आणि दोन जुने सिमेंट बांध दुरुस्ती हे कामे करण्यात आली. अर्थात, हे शक्य झाले ते गावाची एकजूट, सहकार्य, लोकांचे श्रमदान आणि आर्थिक मदतीमुळे. जलसंधारणाबरोबरच मनसंधारण, आरोग्य, माती, पाणी यांविषयी जागरूकता निर्माण झाली.

अशाप्रकारे स्पर्धा संपली. त्यानंतर जलगुढी विधिवत पूजा करून उतरवली. आता प्रतीक्षा होती ती स्पर्धेच्या निकालाची आणि वरुणराजाच्या कृपेची. तो क्षण आला २२ जूनला. वरुणराजा आपल्या सहस्रधारांनी जामदा गावावर बरसला. सर्वांनी केलेल्या कामाचे फळ पहिल्याच पावसात पाण्याच्या रूपाने मिळाले. जामदा आणि परिसरात झालेल्या मोठ्या पावसाने सर्व रचना तुडुंब भरून वाहू लागल्या. जवळपास दोन वर्षे पुरेल असा जलसाठा निर्माण झाला. पहिल्या पावसाने जमिनीत इतके पाणी मुरले की, चार दिवसांतच विहिरींना पाझर फुटले. भूजल पातळी वाढली. गावाला पावसाच्या रूपाने अमूल्य असे बक्षीस मिळाले. आता प्रतीक्षा होती स्पर्धेच्या निकालाची. ११ ऑगस्ट रोजी जाहीर झाला आणि जामदा गावाला तालुकास्तरीय द्वितीय क्रमांकाचे ६ लाख रुपयांचे बक्षीस मिळाले. पाऊस आणि बक्षीस यामुळे आनंद द्विगुणित झाला.

२०२० मध्ये चाळीसगाव तालुका वॉटर कप स्पर्धेतून बाहेर काढला गेला. ह्यावर्षी पाण्याचे काम थांबणार असे वाटत असताना डॉ. चव्हाण तालुक्याच्या मदतीसाठी धावून आले. ५०० कोटी लिटर्स जलसाठा हे अभियान हाती घेतले. डॉ. चव्हाण आणि सर्व जलयोद्ध्यांनी हिवरे बाजारचे सरपंच पोपटराव पवार यांचा पाण्यासंबंधित कार्यक्रम आयोजित केला. तालुक्यातील गावकऱ्यांनी चांगल्याप्रकारे प्रतिसाद दिला. लोक स्वतःहून पुढे आले व मदतीचा हात दिला. या कामाचा एवढा प्रचार आणि प्रसार केला की, आमदार मंगेश चव्हाण, भारतीय जैन संघटना, नाम फाउंडेशन आणि रोटरी क्लब आदी संस्थांनी मशिनसाठी मदत केली.

मार्चमध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. यात गावकऱ्यांना मशीन उपलब्ध करून दिले आणि डिझेलचा खर्च स्वतः शेतकऱ्यांनी करायचा असे ठरले. 'मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा' निर्माणाचे काम लॉकडाऊनचे सर्व नियम पाळून करण्यात आले. पाण्याची ही वारी जून महिन्यापर्यंत अखंडपणे सुरूच राहिली. यात भऊर गाव, दस्केबर्डी आणि जामदा या गावांमध्ये नाला खोलीकरणाचे काम झाले. भऊर आणि दस्केबर्डीमध्ये नाला खोलीकरणासोबत रस्त्याचेही काम झाले. पाण्यासोबत शेतकऱ्यांच्या रस्त्याची समस्यादेखील दूर झाली. नाल्यातील गाळ शेतीसाठी वापरला गेला. जामदाबरोबरच भऊर आणि दस्केबर्डी येथील लोकांचेही या कामासाठी मोठ्या प्रमाणात सहकार्य मिळाले. भऊर गावासाठी रोटरी क्लब, दस्केबर्डीसाठी भारतीय जैन संघटना व जामद्यासाठी सेवा सहयोग या संस्थांनी अर्ध्या खर्चात पोकलँड मशीन उपलब्ध करून दिले. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी सुरू केलेली ही 'पाण्याची वारी' अखंडपणे सुरू राहणार आहे. आता शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध आहे. दोन्ही हंगामातील पिके आरामात घेतली जातील. आता प्रत्येकाने जलसाक्षर बनून भूजलवाढीसाठी प्रयत्न करावेत. तसेच पाण्याचा कार्यक्षमपणे वापर करावा. 'शेवटी काय तर शेतकरी सुखी तर जग सुखी'. 'अन्नदाता सुखी भवः'...

ग



# वृक्षारोपण आणि जलसंधारण

**गेल्या काही वर्षांत भूगर्भातील पाणीपातळी कमी होत आहे. नद्या कोरड्या पडल्या आहेत. वाढत्या पाणीटंचाईवर ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. अशा परिस्थितीत वृक्षारोपण आणि पावसाचे पाणी शक्य त्या मार्गाने अडविण्यासाठी पुढाकार घेतला जात आहे. '५०० कोटी लिटर्स जलसाठा' ही चळवळ यातूनच निर्माण झाली आहे. प्रा. आर. एम. पाटील हेही यामध्ये योगदान देत आहेत, याविषयी...**

गिरणा खोऱ्याच्या कुशीत विस्तारलेला चाळीसगाव तालुका एकेकाळी सुजलाम् सुफलाम् म्हणून ओळखला जात होता. मात्र, पावसाचे प्रमाण कमी होत गेल्यामुळे हाच तालुका आता झपाट्याने दुष्काळाकडे वाटचाल करीत आहे. पूर्वी बारमाही वाहणारी गिरणामाई विहिरींतून अमर्याद पद्धतीने होणारा पाण्याचा उपसा तसेच कमी पाऊसमान यामुळे पावसाळ्यातदेखील कोरडी पडू लागली आहे. ही परिस्थिती मनाला कुठेतरी सल देऊन जात होती. यासाठी काहीतरी केलं पाहिजे, अशी भावना प्रा. आर. एम. पाटील यांच्या मनात निर्माण होत होती.

पर्यावरणाचे शिक्षण देत असताना 'पाणी अडवा–पाणी जिरवा', 'जल है तो कल है', 'वृक्ष लावा–वृक्ष जगवा' याचे धडे देताना केवळ वृक्षदिंडी काढून पर्यावरणाचे रक्षण किंवा संवर्धन होणार नाही, तर याला कृतिशील कामाची जोड देणे आवश्यक असल्याचे प्रा. पाटील यांच्या लक्षात आले. पतंजली योग समितीचे शिबिर घेत असताना शरीरस्वास्थाबरोबरच प्रकृती (निसर्ग) स्वास्थ्यदेखील तितकेच महत्त्वाचे आहे, याची जाणीव त्यांना झाली. योग शिबिराच्या निमित्ताने असे अनेक समविचारी मित्र, सहकारी भेटले. त्यांच्यासोबत पर्यावरणरक्षणाच्या विषयावर चर्चात्मक वैचारिक देवाण–घेवाण होऊ लागली. त्यातूनच चाळीसगावचे वैद्यकीय अधिकारी कै. डॉ. ज्ञानेश चवात यांच्या प्रेरणेतून 'वृक्षलागवड व संवर्धन' करून पर्यावरण समतोल साधण्यासाठी प्रा. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली किमया ग्रुप स्थापन झाला.

जितेंद्र भालेराव, लक्ष्मण नागवाणी, दिलीप सावंत, मधुकर





आहिरे, शाळीग्राम निकम, सुधीर पाटील अशा स्वयंसेवकांच्या साथीत ५ जून २००९ रोजी चाळीसगाव न्यायालय परिसरात वृक्षारोपण करून कामाला सुरुवात केली. किमया ग्रुपच्या माध्यमातून संपूर्ण तालुक्यात विविध प्रकारचे देशी वृक्ष, औषधी वृक्षांची लागवड व रोप वितरणाचे काम काम आजही सुरू आहे. हाच धागा पकडत वनांबरोबरच पाणी किंवा जलसंवर्धनही तितकेच महत्त्वाचे असल्याने किमया ग्रुपच्या माध्यमातून जनजागृती सुरू झाली. मात्र, अपेक्षेप्रमाणे लोकांचा प्रतिसाद मिळत नव्हता. तरीही काम सुरूच होते. २०१८-१९मध्ये पानि फाउंडेशनच्या स्पर्धे त चाळीसगाव तालुक्याचा समावेश झाला. तालुका समन्वयक विजय कोळी, सुनील पाटील व त्यांच्या टीमशी प्रा. पाटील यांची भेट झाली. त्यांच्या टीमला किमया ग्रुपने पूर्ण सहकार्य केले. प्रा. तुषार निकम, एकनाथ माळतकर, आरस्ता माळतकर, शशांक आहिरे, श्रीमती सविताताई राजपूत व किमया ग्रुपच्या सहकाऱ्यांनी तालुक्यातील 'पाच-पाच' गावांत जाऊन स्पर्धेचे फॉर्म भरून घेणे, शोषखड्डे, वृक्षारोपण याविषयी जनजागृती केली, तसेच मित्रपरिवारासह जामदा, वरखेडे, बोरखेडे, रांजणगाव या गावांमध्ये सक्रिय श्रमदान केले, त्यामुळे जामदा, बोरखेडे यांसारख्या काही गावांना वॉटर कप स्पर्धेचे बक्षीसही मिळाले. २०१९-२०मध्ये मात्र चाळीसगाव तालुक्याला वॉटर कप स्पर्धे तून वगळण्यात आले. त्यामुळे पुन्हा कामात अडथळा निर्माण होतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली.

दरम्यानच्या काळात गिरणा परिसरातील धामणगावात सक्तवसुली संचालनालयाचे (ईडी) उपसंचालक डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गावकरी, शेतकरी तसेच सैन्यदलातील आजी-माजी सैनिकांच्या सहकार्यातून जलसंवर्धनाची चळवळ सुरू झाली होती. धामणगाव परिसरातील शिवारांमध्ये खूप मोठे जलसाठे उभारले गेले आहेत. परिसरातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा झाला आहे. ही माहिती मिळाल्यानंतर प्रा. पाटील यांनी धामणगावला जाऊन प्रत्यक्ष काम पाहिले. जून २०१९मध्ये प्रा. तुषार निकम सरांनी चाळीसगाव तालुक्यातील वृक्षप्रेमी, पर्यावरणप्रेमी, जलमित्र यांची सहविचार सभा घेतली. या सभेत प्रा. पाटील यांची भेट डॉ. चव्हाण यांच्याशी झाली. मागील वर्षाचा आढावा घेताना समोर आलेल्या अडचणी तसेच प्रशिक्षणाचे व नियोजनाचे महत्त्व त्यांच्या लक्षात आले. डॉ. चव्हाण यांच्यामुळे त्यांना एक नवी उमेद आणि आशेचा किरण मिळाला.

प्रा. पाटील यांनी व्यक्तिमत्त्व विकास व नेतृत्वगुण विकास याचे सुनियोजन केले. त्यातून '५०० कोटी लिटर्स जलसाठा' या मिशनची मुहूर्तमेढ रोवली गेली. एक लक्ष्य निश्चित करण्यात आले.

### आनंदाचे डोही...

*तीन ते चार पावसांनंतरदेखील वरच्या भागातून आलेले पाणी या खोलीकरणाच्या भागातच जिरत आहे. नदीत वाहून जाणारे पाणी याठिकाणी जिरविण्यात मोठे यश मिळाले आहे, त्यामुळे परिसरातील शेतकरी तसेच प्रा. पाटील व त्यांचे सहकारी आनंदित झाले. अनेकांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते. हे सर्व चित्र पाहून 'मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा'चा एक कार्यकर्ता म्हणून प्रा. पाटील यांनाही मोठे समाधान मिळाले.*



त्यासाठी पुन्हा एकदा आपल्या १२ सहकारी जलमित्रांवर प्रत्येकी पाच गावांची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांना 'पाच-पाटील' असे संबोधले जात होते. त्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम ठरविण्यात आला. प्रत्येक महिन्याच्या दुसरा शनिवारी-रविवारी सकाळी ९ ते सायंकाळी ५ अशा वेळेत डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी समग्र असे बहुमोल आणि विचार प्रवर्तक असे मार्गदर्शन केले. त्यामुळे प्रा. पाटील यांनाही त्यांच्या कामातील त्रुटी, कमतरता भरून काढता आल्या. सामाजिक जीवनाबरोबरच व्यक्तिगत जीवनातदेखील त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

प्रशिक्षणादरम्यान 'पाच-पाटील' नेमून दिलेल्या गावांत जाऊन सर्वेक्षण करणे, नियोजन करणे, गावपातळीवर समित्या स्थापन करणे, आढावा घेणे अशी कामे करीत होते. या 'पाच-पाटलां'च्या मेहनतीचे फळ म्हणून तालुक्यातील १६ गावांत नाला खोलीकरणाचे काम यशस्वीपणे पूर्ण झाले. या कामासाठी सकाळ रिलीफ फंड, भारतीय जैन संघटना यांचे पोकलेन व जेसीबी उपलब्धतेसाठी सहकार्य मिळाले. या मशिनरींना लागणारे डिझेल शेतकऱ्यांच्या सहभागातून उपलब्ध झाले.

प्रा. पाटील यांच्याकडे दसेगाव, दडपिंप्री या गावांतील वेशीवर असलेल्या बेलगंगा नाल्याची जबाबदारी होती. पिंप्रीतील तनिष्का महिला बचत गट व सकाळ रिलीफ फंड यांच्या अर्थसहाय्यातून व शेतकरी सहभागातून उपलब्ध झालेल्या डिझेलच्या माध्यमातून त्यांनी याठिकाणी नालाखोलीकरणाचे काम पूर्ण केले. पोकलेनच्या सहाय्याने सुमारे १४८ तासांत हे खोलीकरण करण्यात आले. जवळपास १ किलोमीटर अंतराचे खोलीकरण झाले व दोन्ही बाजूंनी शेतकऱ्यांसाठी शेतीरस्ताही तयार झाला. या नाल्यात सुमारे १ ते दीड कोटी लिटर क्षमतेएवढे पाणी साठू शकते. याचा

> दडपिंप्री आणि दसेगावमधील नालाखोलीकरणाच्या कामाचा अनेक शेतकऱ्यांना लाभ मिळणार असल्यामुळे झालेला आनंद शब्दात व्यक्त करू शकत नाही. कुणी जलमित्र म्हटले की मन प्रसन्न होते. नवसंजिवनीच मिळते. चैतन्य निर्माण होते आणि नव्या कामासाठी उत्साह वाढतो.
>
> **- प्रा. आर. एम. पाटील**

शिवारातील ८०-९० शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार आहे. पहिल्या पावसात संपूर्ण खोलीकरणात पाणी साठले; पण पुढील २४ तासांत सर्व पाणी भूगर्भात जिरून गेले. याचा परिणाम असा झाला की, तिसऱ्या दिवशी परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीत वाढ झालेली दिसून आली.

या कामासाठी प्रा. पाटील यांना दडपिंप्री व दसेगावचे सरपंच, ग्रामसेवक, नीलेश साळुंखे, कैलास देवरे, मनसिंग जिभाऊ, मुरलीधर चव्हाण, वाल्मिकअण्णा, प्रकाश राठोड या तरुण कार्यकर्त्यांबरोबरच दडपिंप्रीचा तनिष्का महिला बचत गट, पोलिसपाटील संजय राजपूत, देवीदास साळुंखे, महेंद्र पवार यांचे अनमोल सहकार्य मिळाले. या सर्वांच्या सहकार्यातूनच हे काम उभे राहिल्याची भावना ते व्यक्त करतात. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण, चाळीसगावचा जलमित्र परिवार, सकाळ रिलीफ फंड यांच्यामुळेच हे काम शक्य झाल्याचे सांगून या सर्वांचे ते आभार मानतात... ग

# चळवळीला पाठबळ!

**लोकचळवळी लोकसहभागातून यशस्वी होतात. तरुण, प्रतिष्ठित, व्यावसायिक, महिला या वर्गांचा सहभाग त्या चळवळीत जसजसा वाढत जातो तसतसे चळवळ व्यापक बनते. चाळीसगावच्या भूजलपातळीचा आणि शेत शिवारचा चेहरा मोहरा बदलून टाकणाऱ्या 'मिशन ५०० कोटी लिटर्स' चळवळीचेही असेच आहे. ही चळवळ महिला, तरुण आणि सुशिक्षित वर्गाने खऱ्या अर्थाने पुढे नेली. यामध्ये शशांक अहिरे सक्रिय सहभागी आहेत.**



स्वतःचा व्यवसाय असलेले शशांक मधुकर अहिरे मेकॅनिकल इंजिनिअर आहेत. पर्यावरण व शेती यासाठी काम करण्याची त्यांना आवड. आपल्या कृषिपूरक व्यवसायासंबंधी अधिक माहिती घेण्यासाठी त्यांनी फेब्रुवारी २०१८ मध्ये जळगाव येथे पद्मश्री सुभाष पाळेकर यांच्या नैसर्गिक शेतीचे शिबिरात सहभाग घेतला. पाळेकर यांच्या विचारांनी प्रभावित होऊन शशांक नैसर्गिक शेती व विषमुक्त अन्नाच्या चळवळीत सक्रियपणे सहभागी झाले. त्या चळवळीचा भाग म्हणून त्यांनी जळगाव नॅचरल्स या संस्थेमार्फत चळवळीतील नैसर्गिक शेतकरी ते थेट ग्राहक या पद्धतीने विक्री व्यवस्था चाळीसगाव शहरात सप्टेंबर २०१९ पासून सुरू केली.

शशांक अहिरे यांच्या पाणी चळवळीत सहभागाचा किस्सा उल्लेखनीय आहे. जळगाव जिल्ह्यातील काही तालुक्यांत मागील काही वर्षांपासून पानि फाउंडेशनमार्फत जलसंधारणाची कामे सुरू होती. आपल्यालाही त्या विधायक कामात कसे सहभागी होता येऊ शकते? यासाठी ते उत्सुक होते; परंतु स्पर्धेत सहभागी गावांनाच ही कामे करता येतात असे त्यांना सांगण्यात आले; परंतु आपण जलमित्र म्हणून एक मे रोजी महाश्रमदानात सहभागी होऊन योगदान देऊ शकतो, हे कळल्यानंतर त्यांनी अमळनेर तालुक्यासाठी नोंदणीही केली; परंतु त्यावेळी काही कारणांमुळे त्यांना सहभागी होता आले नाही. डिसेंबर २०१८ मध्ये पानि फाउंडेशनच्या सत्यमेव जयते वॉटर कप-२०१९ या स्पर्धेसाठी चाळीसगाव तालुकाही घेण्यात आला. त्यावेळी शशांक यांच्या आनंदाला पारावर उरला नाही.

३१ डिसेंबर २०१८ रोजी त्यांनी पोलीस ग्राऊंड येथे स्पर्धेविषयीच्या माहितीपर प्रदर्शनाला भेट दिली व तिथे सहभागाविषयी चौकशी केली, त्यावेळी तालुका समन्वयक विजय कोळी व सुनील पाटील यांनी सहभागासाठी फॉर्म नंबर १ घेण्याचा तो शेवटचा दिवस असल्याचे सांगितले. शशांक यांच्या तिरपोळे गावातर्फे अजून फॉर्म कोणीही घेतला नसल्याचेही सांगितले. शशांक यांनी गावासाठी तो फॉर्म घेतला व या चळवळीत गावाच्या वतीने सहभागी झाले. सरपंचांकडून अगदी उत्साहाने फॉर्म नंबर १ व २ भरून स्पर्धेत सहभाग घेतला. त्यानंतर पानि फाउंडेशनच्या टीममार्फत गावसभा घेण्यात आल्या. प्रशिक्षणासाठी नावनोंदणीही सुरू झाली. तिरपोळे ग्रामस्थ मंडळीही प्रशिक्षणासाठी उत्सुक होती. फेब्रुवारी महिन्यात तिरपोळे गावाला प्रशिक्षणासाठी जवखेडे (ता. अमळनेर) येथे जायचे






होते; परंतु नेमकी १७ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी हा कालावधी मिळाला व बऱ्याच इच्छुक मंडळींनी शिवजयंतीच्या मिरवणुकीच्या कार्यक्रमामुळे प्रशिक्षणाला जायला त्यांचा नकार कळविला, त्यामुळे स्वतः शशांक, डॉ. पंकज पाटील, तुषार अमृतकार हे प्रशिक्षणात सहभागी झाले. दुष्काळ हा निसर्गनिर्मित नसून, मानवनिर्मित आहे व त्याचे निराकरण करण्यासाठी प्रत्येकानेच आपापल्या परीने प्रयत्न करायला हवेत हे अगदी सहज सोप्या पद्धतीने हसत-खेळत समजले.

जवखेडेतील कामे व गावकऱ्यांची एकी या गोष्टी शशांक यांना खूप भावल्या. प्रशिक्षणातून परतत असतानाच आपल्या तालुक्यातही अशीच आदर्श गावे निर्माण करण्यासाठी प्रयत्न करायचाच ही खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली. २०१९ ची शिवजयंती त्यांनी जवखेडे येथे श्रमदान करीत साजरी केली. त्यानंतरच्या बॅचला गावातील इतर जलमित्रही प्रशिक्षण घेऊन आले. या सर्व जलमित्रांनी एकमेकांच्या गावांना भेटी देत आपली गावे स्पर्धेत उतरविण्यासाठी प्रयत्न केले; परंतु शशांक यांची गावे गिरणा नदीकाठी असल्यामुळे त्यांना या स्पर्धेतून होणाऱ्या कामांचे महत्त्व गावकऱ्यांना समजाविण्यात यश आले नाही. त्याचवेळी इतर काही गावांत मात्र स्पर्धेसाठी चांगली कामे सुरू झालेली होती. शशांक आणि त्यांचे सहकारी मित्र सुट्टीच्या दिवशी या गावांमध्ये श्रमदानाला जाऊन त्यांचा उत्साह वाढवू लागले. त्यातूनच मग विविध गावांतील सर्व जलमित्रांच्या एकमेकांशी ओळखीही झाल्या.

रांजणगाव येथील महाश्रमदानावेळी डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांची भेट झाली. ते स्वतः तिथे श्रमदान करत असलेले बघून सर्वांचाच उत्साह द्विगुणित झाला. हळूहळू पाणी, पर्यावरणासाठी काम करणाऱ्या या सर्व जलमित्रांचा जलमित्र परिवारच तालुक्यात तयार झाला. पुण्यातील ज्येष्ठ भूजलतज्ज्ञ व सहज जलबोधकार म्हणून प्रसिद्ध असलेले उपेंद्रदादा धोंडे यांच्याशीही शशांक यांचा परिचय झाला. स्पर्धा संपल्यानंतरही जलसंधारणाची व वृक्षारोपणाची कामे सुरूच ठेवायला हवीत अशी सर्व जलमित्रांची इच्छा होती.



त्यातूनच सर्वांनी एकत्र येत झाडांची भिशी हा उपक्रम तालुक्यात सुरू केला. त्या अंतर्गतच मागील वर्षी तेरा सदस्यांनी मिळून एकूण ११६ देशी झाडे तालुक्यात विविध ठिकाणी लावली व त्यांच्या संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक सदस्याने घेतली.

### मिशनची सुरुवात

त्याचदरम्यान डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांनी जलमित्रांसाठी नेतृत्वगुण विकसन व व्यक्तिमत्त्व विकासाचे ट्रेनिंग देत तालुक्यात 'मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा' हा उपक्रम हाती घेतला. जलसंधारणासाठी मोठमोठ्या संस्था तालुक्यात आलेल्या असतानाही लोकसहभाग मिळत नसेल तर स्थानिक युवकांमध्ये नेतृत्वगुणांचा अभावही असल्याचे त्यांच्या लक्षात आले. रांजणगाव, धामणगाव व इतर काही गावांत कामे कशी चालू आहेत, 'पाच-पाटील' संकल्पना काय आहे, याची माहिती डॉ. चव्हाण यांनी दिली. मागच्या वर्षी आपल्याला एक गावसुद्धा तयार करणे खूप जिकीरीचे झाले होते, तर आता पाच गावे कशी तयार होणार? असा प्रश्न सर्वांच्या मनात निर्माण झाला; पण डॉ. चव्हाण यांनी सर्वांची हिंमत बांधली. त्यांनी सर्वांच्या मनातून अपयशाची भीती काढून टाकल्यामुळे सगळे आत्मविश्वासाने कामाला लागले.



## लोकसहभाग खऱ्या अर्थाने यशस्वी

*तालुक्यात यावर्षी पानि फाउंडेशन किंवा अन्य मोठी सामाजिक संस्था आलेली नसतानाही सर्वांनी मिळून डॉ. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जलसंधारणाचा अभिनव उपक्रम तालुक्यात यशस्वीपणे राबविला. त्याचे परिणाम आता दिसले आहेत. परिसरातील पाणी पातळी वाढली आहे. शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. या अभियानातून साचलेले पाणी प्रत्येक घरात लक्ष्मी घेऊन येईल, अशी आशा प्रत्येकाला वाटत आहे.*



### सकारात्मक गुणांची पेरण

दिलेला शब्द, दिलेली वेळ पाळणे, सकारात्मक वर्तुळ तयार करणे, असे धडे डॉ. चव्हाण यांच्याकडून मिळाले. त्यातून सर्वांची चांगलीच घडण झाली. सहज जलबोधकार उपेंद्रदादा धोंडे यांचीही 'नाला खोलीकरण' विषयावर शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शनासाठीची ऑनलाइन कार्यशाळा घेण्यात आली. शशांक यांनी या उपक्रमासाठी ब्राम्हणशेवगे, नाईकनगर, खडकी बु., तांबोळे बु. व कुंझर अशी पाच गावे घेतली होती. त्यातील पहिल्या टप्प्यात ब्राम्हणशेवगे व नाईकनगर या दोन्ही गावांचे गावप्रमुख असलेले सोमनाथभाऊ माळी हे स्वतःच 'पाच-पाटील' म्हणून पुढे ते मिशनमध्ये सहभागी झाले व या दोन्हीही गावांमध्ये त्यांच्या नेतृत्वात मोठी कामे झाली.

खडकी व तांबोळे या गावातील गावप्रमुखांचीही कामे करून घेण्याची चांगली तयारी होती; परंतु लॉकडाऊनमुळे काही तांत्रिक अडचणी आल्यामुळे कामे होऊ शकली नाहीत. पुढील वर्षी या दोन्ही गावांतही काम करण्याचा निर्धार आहे. कुंझर या गावातील जलमित्र टीमने गेल्यावर्षीच्या वॉटर कप स्पर्धेतही खूप चांगली कामगिरी केलेली आहे. मिशनमध्ये कुंझर हे गाव सहभागी करून घेण्याचे कारण म्हणजे शशांक यांचे मित्र चंद्रशेखर शिसोदे या गावातील आहेत. ते पुण्यात स्थायिक असूनदेखील गावासाठी काहीतरी करण्याची त्यांची धडपड सुरू असते. जलमित्र परिवाराचा पाणी व पर्यावरणासाठी काम करण्याचा उद्देश कोणालाही लगेच समजावा, असा छानसा लोगोही चंद्रशेखर यांनीच कल्पकतेने बनविला आहे.

### कुंझरचा कायापालट

कुंझरच्या गावकऱ्यांनी गेल्या काही वर्षांत त्यांच्या गावातील शाळाही डिजिटल केली आहे तसेच आजमितीला या गावात सतरा शेतकरी गट काम करीत आहेत. अशा या कुंझर गावाचे गावप्रमुख म्हणून मिशनमध्ये भागवत बैरागी यांनी व चंद्रशेखर शिसोदे, भगवान सोनवणे, प्रल्हाद सोनवणे, राकेश गुरव, समाधान महाजन, भोला राजपूत व इतर सर्व जलमित्रांनी शेतकऱ्यांसाठी लोकसहभागातून मोठे काम त्यांच्या गावात करून घेतले. या गावासाठी रोटरी क्लबच्या माध्यमातून मिळालेल्या जेसीबी मशीनने गावात एकूण ५०० तास काम झाले. २७ शेतकऱ्यांनी एकूण दोन लाखांचे डिझेल स्वतः टाकले. त्यातून २८,००० घनमीटर काम होऊन २ कोटी ८१ लाख लिटरचा पाणीसाठा गावशिवारात तयार झाला आहे. याचा लाभ २०० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राला होणार आहे....



# पाणीदार तळेगाव!

**ध्यास घेतलेली फळी सोबत असली की, ऐतिहासिक काम उभे राहते. त्याचा लाभ सर्वसामान्य शेतकऱ्यांना होत असतो. त्याचे समाधान अवर्णनीय असते. चाळीसगाव तालुक्यात उभे राहिलेले 'मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा' हे अभियान कष्टांची आणि त्यागाची यशोगाथा आहे. या अभियानात घाम गाळणाऱ्या प्रत्येकाचे कौतुक करावे तितके कमीच; पण प्रत्येक शिलेदाराची दखल घेणे महत्वाचे आहे. त्यातील एक शिलेदार म्हणजे शिक्षक असलेले सचिन राणे.**

अभियानाची जागृती, प्रशिक्षण, लोकसहभाग उभा करण्यासाठी केलेले प्रयत्न, शोषखड्डे जागृतीसाठी उभारलेली मोहीम, प्रबोधन आणि तळेगाव पाणीदार करण्यात असलेला सहभाग ही सचिन राणे यांची ओळख. एका वर्षात केलेल्या कामाची भविष्यात पुनरावृत्ती करण्याची दुर्दम्य इच्छा ते व्यक्त करतात.

क्रिकेट म्हणजे भारतीय लोकांचा जीव की प्राण. एकदिवसीय सामना असो की आयपीएल, भारतीय प्रेक्षक टीव्हीसमोरून हलणार नाहीत. मात्र, गेल्या वर्षी म्हणजे २०१९ च्या मे महिन्यात जेव्हा लोक आयपीएल पाहण्यात मग्न होते, त्या उन्हाळी सुट्टीत सचिन राणे, प्रा. तुषार निकम आणि रवींद्र रावराजे वाघ अशा तिघांनी मिळून चाळीसगाव शहरासाठी आणि शहरवासीयांसाठी शोषखड्डा

> पंढरीच्या वारीप्रमाणे पाण्याच्या या वारीत सहभागी होणे आवश्यक आहे. त्यामुळेच आपल्या गावाचे, जिल्ह्याचे, राज्याचे आणि देशाचे भविष्यसुद्धा पाणीदार होणार आहे.

जनजागृती मोहीम सुरू केली. शहराच्या विविध भागांत रात्रीच्या वेळेत प्रोजेक्टरद्वारे शहरवासीयांना जलसंवर्धनाच्या पाणी बचतीच्या विविध क्लिप्स दाखवून पाणी जिरविणे आणि त्याचा पुनर्वापर करणे किती आवश्यक आहे, याची जनजागृती केली.



या तिघांनी शहरात पाणीविषयक जागृतीच्या २७ चौकसभा घेतल्या. लोकांच्या भेटी घेतल्या. त्या कार्यक्रमांतून प्रेरणा घेऊन शहराच्या विविध भागांत ३८० शोषखड्डे तयार करून घेतले आणि हा शोषखड्डे निर्मितीचा उपक्रम आजही सुरू आहे. भविष्यातही तो सुरू ठेवण्याचा त्यांचा संकल्प आहे.

समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींनी एखाद्या कामात सहभाग घेतला की कामाचा प्रसार झपाट्याने होतो. चाळीसगाव नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिकेत मनोरकर यांनी त्यांच्या निवासस्थानी तंत्रशुद्ध शोषखड्डा बनवून घेतला. त्याचप्रमाणे नगर परिषदेतर्फे या मोहिमेला संपूर्ण सहकार्य केले. आणखीही लोकांनी या मोहिमेला प्रतिसाद दिला. त्यातून मोठ्या प्रमाणावर जागृती झाली आणि लोक पाण्याच्या कामाला लागले.

तालुक्याच्या सीमेवरील अत्यंत दुर्गम आणि दुर्लक्षित असलेले जुनोने ही गाव आता १०० टक्के शोषखड्डेयुक्त झाले आहे. डॉ. विनोद कोतकर यांनी हे गाव दत्तक घेऊन तेथील रहिवाशांना मदत, मार्गदर्शन केले. या कामासाठी राणे यांच्या टीमने गावकऱ्यांचे उद्‌बोधन केले. या जागृतीपर कार्यक्रमांमुळे शहर आणि तालुका तंटामुक्त, डासमुक्त आणि दुष्काळमुक्त होण्यास मदत होत आहे. हाच प्रयत्न पुढेही सुरू ठेवण्याचा मानस आहे.

हे करीत असताना तालुका दुष्काळमुक्तीसाठी राणे आणि त्यांच्या टीमने डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनाने 'मिशन ५०० कोटी लिटर्स जलसाठा' अभियान राबविण्यास सुरुवात केली. या अभियानात सर्वांत महत्त्वाचा भाग असलेले 'पाच–पाटील' यांनी गावकरी आणि तेथील लोकप्रतिनिधी यांना नाला खोलीकरण, रुंदीकरण करून जलसंधारण तसेच जलसाठा वाढवून तो सिंचनासाठी कसा उपयोगात आणायचा, याचे कार्यशाळा आणि प्रशिक्षणवर्गातून मार्गदर्शन केले.

सचिन राणे यांनी पाच गावांची जबाबदारी घेतली. तळेगाव हे त्यापैकी एक गाव. २०२०च्या एप्रिलमध्ये आणि मे महिन्यात पोकलेन मशीनद्वारे तळेगाव शिवारात नाला खोलीकरण तसेच रुंदीकरणाद्वारे जवळपास 'नऊ कोटी लिटर्स जलसाठा' निर्माण झाला आहे. त्यासाठी भारतीय जैन संघटना, सकाळ वृत्तपत्र, रोटरी क्लब यांचे सहकार्य लाभले. दोन मशिन्सद्वारे एकूण ५१० तास काम झाले आहे. आज तळेगाव पाणीदार होऊन येथील वर्षानुवर्षांचा दुष्काळ धुवून निघाला आहे.

## कामाचे समाधान...

*केलेले सगळेच काम यशस्वी होतेच असे नाही; पण मिळणारे यश हे प्रचंड आत्मिक समाधान देणारे असते. 'तळेगाव पाणीदार' करण्यासाठी सचिन राणे यांनी खूप वेळ दिला. मेहनत केली. बैठका घेतल्या. त्याचे फळ मिळाले आहे. आज तळेगाव पाणीदार झाले असून, परिसरातील विहिरींची पाणीपातळी वाढली आहे. सामान्य शेतकऱ्याला त्याचा चांगलाच फायदा झाला आहे. हे दृश्य मनाला समाधान देणारे आहे, असे सचिन राणे सांगतात.*

तळेगावची पुनरावृत्ती आणखी चार गावांत करण्याचा प्रयत्न राणे यांनी केला; पण त्यात त्यांना मर्यादित असे यश आले. त्यातच कोरोनामुळे लॉकडाऊन सुरू झाले, त्यामुळे कामावर आणखी मर्यादा आल्या. तरीसुद्धा येणाऱ्या काळात हे अभियान आणखी गतीने आणि उत्साहाने राबविण्याचा त्यांचा मानस आहे. डॉ. उज्ज्वलकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शन, प्रा. तुषार निकम यांचे नियोजन आणि सर्व सहकाऱ्यांचे अथक प्रयत्न यांच्या माध्यमातून मनसंधारणातून जलसंधारण वाढवून दुष्काळमुक्तीसाठी प्रयत्न केला जाणार आहे... ग

**अमृतवेल MEDIA GROUP**

# सभासद / वर्गणीदार फॉर्म

अर्थकारण, उद्योग, जीवनशैली, प्रशासकीय व्यवस्था
या विषयाला वाहिलेली मराठीतील मॅगेझिन्स...

*होय, मला **अमृतवेल मीडिया ग्रुप**चे सभासद/वर्गणीदार व्हायचे आहे.*

- नाव : ..............................................................................................
  ..............................................................................................
- पत्ता : ..............................................................................................
  ..............................................................................................
  ..............................................................................................
- जन्मतारीख : ............/ ............/ ..........................
- मोबाईल : .......................................... लँडलाईन : ..........................................
- ई-मेल : .......................................... व्यवसाय : ..........................................
- मॅगझिन : मनी प्लस ☐ गव्हर्नन्स ☐
- स्वरूप : द्वैवार्षिक : ...... ☐
- कालावधी : ..........................................
- चेक/डीडी नंबर : ..........................................
- पावती क्रमांक : ..........................................
- प्रतिनिधीचे नाव : ..........................................




**वर्गणी : ● द्वैवार्षिक ५००० रु. ●** (दिवाळी अंक, क्लिअरिंग चार्जेस, पोस्टेजसह)

चेक अथवा डीडी **अमृतवेल मीडिया प्रा. लि.** या नावाने (पेएबल ॲट कोल्हापूर) काढावा.

सभासदाची सही ..........................................

amrutwelmedia@gmail.com

**अमृतवेल मीडिया प्रा. लि.**

**मुंबई :** ८४ ए, बरोच सदन, ५०३/पाचवा मजला, देवजी रतनसे मार्ग, दानाबंदर, मुंबई-४००००९.

**कोल्हापूर :** अमृतवेल, शॉप नं.१, सिद्धीविनायक प्लाझा, तवनाप्पा पाटणे हायस्कूलसमोर, राजारामपुरी ११ वी गल्ली, कोल्हापूर-४१६००८

नियमित अंक सुरू करण्यासाठी संपर्क : 9975895756, 9225828602, 9890080121

" A One Stop Solution for Non Ferrous Metal Alloy's Specially Aluminium Alloy's"







Ingots



Die Castings Mainly In HPDC




Aluminium Based Alloys

# Mauli Group Of Companies

## Mauli Metal Industries Pvt. Ltd. Unit-1

**Manufacturers of Nonferrous Metal Alloys**

Plot No. 59,60, MIDC, Waluj, Aurangabad-431 136

## Mauli Metal Industries Pvt. Ltd. Unit-2

**Manufacturers of Nonferrous Metal Alloys**

Gut no.659-660, Village- Chorakhalli, Kallam, Osmanabad-413 505

## Mauli Metal Industries Pvt. Ltd. Unit-3

**Manufacturers of Nonferrous Metal Alloys**

A-12, MIDC, Chakan - Pune

## Chandrasheel Castings Pvt. Ltd.

**Manufacturers of Pressure Die Casting Components and Tools Room**

Gut No.182, Plot No.17, MIDC Waluj, Aurangabad-431 136

## Hitech Electrodes

**Fully Automized machining Centre**

Plot No. k-31, MIDC Waluj, Aurangabad-431 136

Corporate Office

# Mauli Metal Industries Pvt. Ltd.

| Plot No. M-71, MIDC, Waluj, Aurangabad-431 136 | Ph. No.:0240-2555110/2555111, 2554000 |

| Email: maulimetal@gmail.com | Purchase@maulimetal.com |

Registered Office: Plot No. M-60, MIDC, Waluj, Aurangabad-431136| CIN No. U28113MH2011PTC215410




AMRUTWEL MEDIA
अमृतवेल मीडिया

• गव्हर्नन्स • मनी प्लस •

9890080121 / 9225828602 www.amrutwelmedia.com